गुरुवार, ६ जानेवारी २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक १७०
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## राज्यात लॉकडाऊन नाही, पण निर्बंध कठोर होणार



**मुंबई :** राज्यात लॉकडाऊन लागू केला जाणार नाही, मात्र निर्बंध कठोर होणार आहेत. याबाबतचा निर्णय आढावा उच्चस्तरीय बैठकीत घेण्यात आला आहे. राज्यात कोरोनाबाधितांचा आकडा वाढत आहे. त्याचप्रमाणे ओमायक्रॉनचाही प्रादुर्भाव झालेला आहे. या पार्श्वभूमीवर बुधवारी (दि. ५) मंत्रालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दालनामध्ये बैठक झाली. या बैठकीला उपमुख्यमंत्र्यांसह आरोग्यमंत्री राजेश टोपे, मुख्य सचिव, आरोग्य सचिव, सार्वजनिक आरोग्य आयुक्त व्हीसीद्वारे उपस्थित होते. या वेळी लॉकडाऊनऐवजी कठोर निर्बंध लागू करण्याचे ठरले. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा होकार आल्यावर राज्यासाठी नवे आदेश लागू करणार आहोत, असे या वेळी उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले.

### अंतरंग

अवैध मासेमारीप्रकरणी अलिबागेत नौका जप्त/२
रायगड जिल्ह्यातील सर्व शाळा आजपासून बंद/५
उलवे नोड प्रीमियर लीग २०२२ला थाटात प्रारंभ/६



# ओबीसी आरक्षणाबाबत मविआ सरकार गंभीर नाही

## आमदार प्रशांत ठाकूर यांचा आरोप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाविकास आघाडी सरकारच्या निष्क्रिय कारभारामुळे राज्यातील ओबीसी समाजाचे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षण रद्द झालेले असताना याच सरकारमधील मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी ओबीसींबाबत वादग्रस्त वक्तव्य करून त्यांच्या जखमेवर मीठ चोळले आहे, तर दुसरीकडे ओबीसी समाजाचे आरक्षण परत मिळावे यासाठी महाविकास आघाडी सरकार उदासीन असल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी मविआ सरकार ओबीसी आरक्षणाबाबत गंभीर नसल्याचा आरोप केला आहे.

राज्याचे गृहनिर्माणमंत्री जितेंद्र आव्हाड यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित एका कार्यक्रमात बोलताना, 'ओबीसींवर माझा फारसा विश्वास नाही, कारण जेव्हा मंडल आयोग आला तेव्हा मंडल आयोगाचे आरक्षण ओबीसींसाठी होते, पण जेव्हा लढायची वेळ आली तेव्हा ओबीसी लढायला मैदानात नव्हते, कारण ओबीसींना लढायचे नसते,' असे बेताल वक्तव्य केले. त्यामुळे ओबीसी समाजात संतापाची लाट उसळली आहे.

मंत्री आव्हाड यांच्या वादग्रस्त वक्तव्याचा आमदार प्रशांत ठाकूर यांनी निषेध केला आहे. ओबीसींच्या राजकीय आरक्षणाचे मारेकरी कोण आहेत हे महाराष्ट्रातील जनतेने पुरते ओळखले आहे. सत्ताधारी नेत्यांची अशी वक्तव्य जातीय तेढ निर्माण करण्यात भरच घालतात, असे म्हणत आमदार प्रशांत ठाकूर यांनी अशी बेताल वक्तव्य करणारे मंत्री ओबीसींचे राजकीय आरक्षण पुन्हा मिळवून देण्यासाठी गांभीर्याने प्रयत्न करतील का, असा सवाल उपस्थित केला आहे.

ओबीसी समाजाला हक्काचे आरक्षण परत मिळावे यासाठी महाविकास आघाडी सरकार उदासीन असल्याचे समोर आले आहे. आरक्षणासाठी ओबीसींचा इम्पिरिकल डाटा गोळा करणे आवश्यक आहे, मात्र हा डाटा गोळा करण्याची जबाबदारी असलेल्या राज्य मागासवर्ग आयोगाला त्यांनी मागणी करूनही मविआ सरकारने कर्मचारी पुरविण्याचा निर्णय अद्याप घेतला नाही. त्यामुळे पाच महिने उलटूनही हे काम रखडले आहे. परिणामी राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ओबीसी आरक्षणाशिवाय झाल्या, तर पुढील निवडणुकांमध्येही हीच नामुष्की ओढावण्याची चिन्हे आहेत.

ओबीसींच्या महत्त्वाच्या आरक्षणप्रश्नी महाविकास आघाडी सरकार चालढकल करीत असल्याने आमदार प्रशांत ठाकूर यांनी संताप व नाराजी व्यक्त केली आहे. 'हा घ्या आणखी एक पुरावा. ओबीसींना राजकीय आरक्षण मिळू नये यासाठी मविआ प्रयत्न करीत असल्याचा संशय बळावतोय! एकीकडे ओबीसी समाजाबद्दल सत्ताधारी मंत्री बेताल वक्तव्य करतात. दुसरीकडे सरकार अजूनही गंभीर नाही. आरक्षणाबाबत आपण किती गंभीर आहात याचे उत्तर सत्ताधाऱ्यांनी दिले पाहिजे,' असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले आहे.

## राज्यातील महाविद्यालये १५ फेब्रुवारीपर्यंत बंद

### परीक्षा होणार ऑनलाइन

**मुंबई : प्रतिनिधी**



कोरोनाच्या वाढत्या रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व अकृषी महाविद्यालये आणि तंत्रशिक्षण संस्था १५ फेब्रुवारीपर्यंत बंद राहणार असल्याची घोषणा राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी बुधवारी (दि. ५) केली. त्याचप्रमाणे सर्व विद्यापीठांच्या परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्याचा निर्णयदेखील त्यांनी जाहीर केला.

महाविद्यालये आणि परीक्षांच्या बाबतीत राज्य सरकार निर्णय घेणार असल्याची चर्चा सुरू होती. या संदर्भात बैठक झाल्यानंतर बुधवारी मंत्री उदय सामंत यांनी निर्णय जाहीर केला.

सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, तंत्रनिकेतन, विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयांची परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेतली जाणार आहे.



**पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १८, १९ आणि २०व्या राज्यस्तरीय व रायगड जिल्हास्तरीय या सर्वांत मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ बुधवारी खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात झाला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ कवी व साहित्यिक रामदास फुटाणे, माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाचे माजी महासंचालक व जलसंधारण विभागाचे विद्यमान सचिव दिलीप पांढरपट्टे, ललित मासिकाचे स्तंभलेखक रविप्रकाश कुलकर्णी, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे, भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत आदी उपस्थित होते.** (छाया : लक्ष्मण ठाकूर) **वृत्त उद्याच्या अंकात.**

## महाडमधील विन्हेरे शाळेतील १७ जण कोरोना पॉझिटिव्ह

### १५ विद्यार्थी, दोन शिक्षक बाधित

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यात एकाच शाळेतील १७ जण कोरोना पॉझिटिव्ह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. विन्हेरे येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये १५ विद्यार्थी आणि दोन शिक्षकांना कोरोनाची लागण झाली आहे.

विन्हेरे येथील न्यू इंग्लिश स्कूलमधील एक विद्यार्थी कोरोना पॉझिटिव्ह आढळून आल्यानंतर सर्वच विद्यार्थी आणि शिक्षकांची अँटीजेन चाचणी करण्यात आली होती. या चाचण्यांचे अहवाल समोर आले असून यामध्ये १५ विद्यार्थी आणि दोन शिक्षकांचा समावेश आहे, अशी माहिती तालुका आरोग्य अधिकारी नितीन बावलेकर यांनी दिली.

कोरोनाचा संसर्ग झालेल्या १७ जणांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे. या सर्वांना झालेला हा संसर्ग असिम्प्टोमॅटिक आहे, म्हणजेच कोणालाही कोरोनाची कोणतीही लक्षणे दिसून येत नाहीत. सर्वांना होम आयसोलेशनमध्ये ठेवण्यात आले आहे.

### निवडक

#### मुंबईच्या जेजे रुग्णालयातील ६१ डॉक्टर कोरोना पॉझिटिव्ह

**मुंबई :** येथे कोरोनाने कहर केला असल्याने आधीच चिंता वाढलेली असताना जेजे रुग्णालयातील ६१ निवासी डॉक्टरांना कोरोनाची लागण झाली आहे. निवासी डॉक्टरांच्या संघटनेकडून ही माहिती एएनआयला देण्यात आली आहे.

#### महिलांचे अश्लील फोटो; टेलीग्राम चॅनेलवर कारवाई

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने एका टेलीग्राम चॅनेलवर कारवाई करीत ते ब्लॉक केले आहे. या चॅनेलवरून हिंदू महिलांचे अश्लील फोटो शेअर केले जात होते. बुली बाई अॅप प्रकरणानंतर आता एका चॅनेलवर कारवाई करण्यात आली आहे.

#### १५ ते १८ वयोगटातील एक कोटी डोस पूर्ण

**नवी दिल्ली :** देशात १५-१८ वयोगटातील एक कोटीहून अधिक मुलांना कोरोना लसीचा पहिला डोस मिळाल्याची माहिती केंद्रीय आरोग्यमंत्री मनसुख मांडविया यांनी दिली. भारत बायोटेकची कोवॅक्सिन लस या वयोगटासाठी उपलब्ध आहे.

## पंतप्रधान मोदींच्या सुरक्षेत गंभीर चूक

### पंजाबमध्ये ताफा अडकला, रॅली रद्द




**चंदिगड : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सुरक्षेत मोठी त्रूटी राहिल्याने पंजाबमधील रॅली रद्द करण्यात आली आहे. आंदोलकांनी रस्ता अडवल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या ताफ्यासह १५ ते २० मिनिटे उड्डाणपुलावर अडकले होते. पंतप्रधानांच्या दौऱ्याची कल्पना असतानाही इतकी मोठी घोडचूक झाल्याने भाजपकडून संताप व्यक्त केला जात आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पंजाबमधील फिरोजपूर येथे बुधवारी रॅली व प्रचारसभा होणार होती. सकाळी पंतप्रधान मोदी भटिंडा येथे पोहचले व तेथून ते हुसैनीवाला येथील राष्ट्रीय शहीद स्मारकाकडे हेलिकॉप्टरने जाणार होते, पण पाऊस आणि खराब दृश्यमानतेमुळे पंतप्रधानांनी रस्त्याने राष्ट्रीय शहीद स्मारकाला भेट देण्याचे ठरले. यानंतर पंतप्रधान रस्त्याने प्रवास करण्यासाठी निघाले. शहीद स्मारकापासून सुमारे ३० किमी अंतरावर पंतप्रधानांचा ताफा फ्लायओव्हरवर पोहचला तेव्हा काही आंदोलकांनी रस्ता अडवल्याचे दिसून आले. त्यात पंतप्रधान मोदींना १५-२० मिनिटे फ्लायओव्हरवर अडकून राहावे लागले. पंतप्रधानांच्या सुरक्षेतील ही मोठी त्रूटी होती. यानंतर पंतप्रधान मोदींचा ताफा भटिंडा विमानतळावर परत आणण्यात आला.

सुरक्षेतील या गंभीर त्रूटीची दखल घेत गृहमंत्रालयाने राज्य सरकारकडून सविस्तर अहवाल मागवला आहे. या गैरप्रकाराची जबाबदारी निश्चित करून कठोर कारवाई करावी, असेही राज्य सरकारला सांगण्यात आले आहे.

दरम्यान, भटिंडा विमानतळावर पोहचल्यानंतर पंतप्रधान मोदींनी, 'तुमच्या मुख्यमंत्र्यांना धन्यवाद सांगा की मी भटिंडा विमानतळावर जिवंत पोहचू शकलो,' असे तेथील कर्मचाऱ्यांना सांगितले.




## 'अनाथांची माय' सिंधुताई सपकाळ पंचत्वात विलीन

### पुण्यामध्ये शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**पुणे : प्रतिनिधी**



सामाजिक कार्यकर्त्या आणि 'अनाथांची माय' अशी ओळख असणाऱ्या पद्मश्री सिंधुताई सपकाळ यांचे मंगळवारी पुण्यात निधन झाले. वयाच्या ७४व्या वर्षी त्यांनी पुण्यातील गॅलेक्सी हॉस्पिटलमध्ये अखेरचा श्वास घेतला. सिंधुताईंवर बुधवारी (दि. ५) पुण्यातील नवी पेठ परिसरातील ठोसर पागामध्ये शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

महाराष्ट्राची मदर तेरेसा अशी ओळख असणाऱ्या सिंधुताई सपकाळ यांचे महिनाभरापूर्वी हर्नियाचे ऑपरेशन झाले होते. त्यानंतर त्यांच्यावर उपचार सुरू होते, मात्र हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे मंगळवारी ८च्या सुमारास पुण्यातील गॅलेक्सी हॉस्पिटलमध्ये निधन झाले. त्यांच्या अंत्यसंस्कारावेळी राज्यमंत्री विश्वजित कदम, भाजप नेत्या चित्रा वाघ, आमदार संजय जगताप, माजी आमदार उल्हास पवार, महापौर मुरलीधर मोहोळ, पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता आदी उपस्थित होते.

सिंधुताईंच्या निधनाची बातमी धक्कादायक व दुःखद असल्याचे सांगत राजकीय आणि सामाजिक क्षेत्रामधील अनेक मान्यवरांनी शोक व्यक्त केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही सिंधुताईंना ट्विटरवरून श्रद्धांजली अर्पण केली. 'डॉ. सिंधुताई सपकाळ या कायमच त्यांनी समाजासाठी केलेल्या चांगल्या कामासाठी लक्षात राहतील. त्यांच्या प्रयत्नांमुळेच अनेक मुलांना चांगले जीवन जगता आले. त्यांनी उपेक्षित वर्गातील समाजासाठीही बरेच काम केले आहे. त्यांच्या निधनामुळे फार दुःख झाले आहे. माझ्या सद्भावना त्यांच्या कुटुंबीयांबरोबर आणि हितचिंतकांसोबत आहेत. ओम शांती,' असे ट्विट पंतप्रधान मोदींनी केले आहे.

## ओबीसींबद्दल वक्तव्य आव्हाडांच्या घराबाहेर भाजपचे आंदोलन

**ठाणे : प्रतिनिधी**

राज्याचे गृहनिर्माणमंत्री आणि राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी ओबीसींबद्दल केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावरून भारतीय जनता पक्ष आक्रमक झाला असून बुधवारी (दि. ५) भाजप कार्यकर्त्यांनी आव्हाड यांच्या निवासस्थानाबाहेर आंदोलन केले.

मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी एका कार्यक्रमात बोलताना ओबीसींवर माझा फारसा विश्वास नाही, असे बेताल वक्तव्य केले होते. त्यामुळे सध्या वाद निर्माण झाला आहे. विरोधी पक्ष भाजपही यावरून आक्रमक झाला असून आव्हाड यांच्या राजीनाम्याची मागणी करीत आहे. भाजप कार्यकर्त्यांनी बुधवारी मंत्री जितेंद्र आव्हाड यांच्या निवासस्थानाबाहेर जोरदार आंदोलन केले.

# निर्बंध चालतील, पण लॉकडाऊन नको

## वाढत्या कोरोना रुग्णसंख्येबाबत चंद्रकांत पाटील यांनी स्पष्ट केली भाजपची भूमिका

**पुणे : प्रतिनिधी**

गेली दोन वर्षे कोरोना महासाथीमुळे बिघडलेले अर्थकारण आता रुळावर यायला लागले असताना राज्य सरकारने पुन्हा लॉकडाऊन लागू करू नये. कोरोना रुग्णसंख्या वाढत असल्याने सरकारने कडक निर्बंध लावले तर चालतील, पण लॉकडाऊन नको, अशी भाजपची भूमिका प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी पिंपरी चिंचवड येथे पत्रकारांशी बोलताना जाहीर केली.

ते म्हणाले की, निर्बंधांना विरोध नाही पण लॉकडाऊनला कोणी तयार होणार नाही. गेली दोन वर्षे विद्यार्थी, खेळाडू, व्यापारी, उद्योजक अशा विविध घटकांनी खूप नुकसान सहन केले. हा मोठा कालावधी आहे. आता आणखी किती सहन करणार हा सवाल आहे. त्यामुळे राज्य सरकारने हवे तर कडक निर्बंध लावावेत, पण सर्व काही बंद करण्याची भूमिका असू नये. तसेच कोरोनाचे स्वरूप आता भयानक नाही आणि ही साथ संपण्याची शक्यता आहे, हे तज्ज्ञांचे मतही सरकारने ध्यानात घ्यावे.



एका प्रश्नाच्या उत्तरात ते म्हणाले की, शिवसेनेतील अस्वस्थता हळूहळू बाहेर पडू लागली आहे. काही शिवसैनिक खाजगीत बोलतात, तर काही नेते उघड बोलतात. शिवसेना किंवा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे खऱ्या शिवसैनिकांना फार काळ दाबून ठेऊ शकणार नाहीत. शिवसेनेला खऱ्या हिंदुत्वाकडे जावेच लागेल.

शिवसेनेसोबत भाजपची युती होऊ शकते का, असे एका पत्रकाराने विचारले असता चंद्रकांत पाटील म्हणाले की, अशा शक्यतेबाबत आपल्याला काही माहिती नाही. राजकारणात कधीही काही होऊ शकते, पण त्याबद्दल सांगता येत नाही. सामान्य माणसाची इच्छा आहे की, दोन भावांमध्ये भांडणे झाली तरी केव्हा तरी भांडणे संपवून पुन्हा जुने संबंध निर्माण करावे लागतात. तथापि, आपण युतीबद्दल काही बोलणार नाही. तसे बोलले की, लगेच शिवसेनेच्या मुखपत्रातून आपल्यावर सत्ता गेल्यामुळे झोप लागत नाही, अशी टीका होते. प्रत्यक्षात आपल्याला शांत झोप लागते, असा टोला त्यांनी हाणला.

चंद्रकांत पाटील यांनी ज्येष्ठ समाजसेविका सिंधुताई सपकाळ यांना प्रदेश भाजपतर्फे श्रद्धांजली अर्पण केली. ते म्हणाले की, सिंधुताई या अनाथांच्या माय होत्या. त्यांनी हजारो अनाथ मुला-मुलींचा सांभाळ केला. त्यांनी आभाळाएवढे कार्य केले, पण त्यांना त्याचा अहंकार नव्हता. सिंधुताईंच्या कार्याचे स्वरूप व्यापक आहे. हे कार्य पुढे चालू राहण्यासाठी भाजप मदत करेल. भाजपचे प्रदेश संघटन सरचिटणीस श्रीकांत भारतीय १८ वर्षे पूर्ण केलेल्या अनाथ मुलांसाठी तर्पण या संस्थेच्या माध्यमातून यापूर्वीच काम करत आहेत.





पनवेल : भाजपचे खारघर-तळोजा मंडल सदस्य गुरुनाथ म्हात्रे यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी पुष्पगुच्छ आणि पुस्तक भेट देऊन शुभेच्छा दिल्या. या वेळी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, भाजप युवा मोर्चाचे ग्रामीण अध्यक्ष आनंद ढवळे, राजेश पाटील, राहुल घरत, सुरज म्हात्रे उपस्थित होते.



पनवेल : भारतीय कामगार चळवळीचे आद्यजनक व रविवारच्या सुटीचे निर्माते नारायण मेघाजी लोखंडे यांचे पणतू आणि भाजप कार्यकर्ते गोपीनाथ लोखंडे यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी लोखंडे यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांना नारायण लोखंडे यांचे चरित्र भेट दिले.



उलवे नोड : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे स्वीय्य सहाय्यक अमित जाधव यांना वाढदिवसानिमित्त सुधीर ठाकूर यांच्यासह उलवे नोड प्रीमियर लीग २०२२च्या उद्घाटन सोहळ्यात उपस्थितांनी शुभेच्छा दिल्या.

## पनवेल महानगरपालिकेतर्फे पत्रकार दिनानिमित्त चर्चासत्र

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका सामान्य प्रशासन विभाग अंतर्गत स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला जात आहे. यामध्ये पत्रकार दिनानिमित्ताने स्वातंत्र्य चळवळीतील पत्रकारांची भूमिका व सहभाग या विषयावर ऑनलाइन चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील पत्रकारांनी, नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घ्यावा, असे आवाहन उपायुक्त विठ्ठल डाके यांनी केले आहे.

पनवेल महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागाच्या अंतर्गत स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत आहेत. 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' हा प्रगतीशील भारताच्या ७५ वर्षांचा आणि लोकांचा, संस्कृतीचा आणि कर्तृत्वाचा गौरवशाली इतिहास साजरा करण्यासाठी आणि त्यांचे स्मरण करण्याचा उपक्रम आहे. पनवेल महानगरपालिकेमार्फत गुरुवारी (दि. ६) पत्रकार दिनानिमित्ताने दुपारी १२ वाजता ऑनलाइन चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

या चर्चासत्रात स्वतंत्र भारताच्या ७५ वर्षांमधील जडणघडणीतील पत्रकारितेची भूमिका या विषयावर चर्चा होणार असून साम टीव्हीचे संपादक प्रसन्न जोशी, लोकमत डिजिटल न्यूजचे संपादक आशिष जाधव सहभागी होणार आहेत. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व पत्रकार, वृत्त निवेदक व संपादक, तसेच नागरिकांनी यामध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन पनवेल पालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. या चर्चासत्रात सहभागी होण्यासाठी https://forms.gle/ZcAxFrduHBGf3TBx7 लिंकवर क्लिक करून नोंदणी करावी.

## रायगडात गुन्हेगारीचे प्रमाण वाढले

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात २०२१मध्ये २२५४ गुन्हे दाखल झाले होते. त्यापैकी २०३१ गुन्हे उघडकीस आणण्यात रायगड पोलिसांना यश आले. २०२० पेक्षा २०२१मध्ये २७३ गुन्हे जास्त घडले आहेत, परंतु मागील वर्षाच्या तुलनेत गुन्हे उघडकीस आण्याचे प्रमाण मात्र जास्त आहे. २०२०मध्ये गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण ७९ टक्के होते. यंदा हे प्रमाण ८२ टक्के आहे. गुन्हे उघडकीस आणण्यात रायगड पोलीस दल कोकण परिक्षेत्रात सर्वोत्तम आहे, अशी महिती रायगड पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांनी दिली.

रायगड पोलीस दलाच्या वार्षिक कामगिरीची माहिती देण्यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दुधे यांनी ही माहिती दिली. अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक दयानंद गावडे या वेळी उपस्थित होते.

### 'सीसीटीव्हीं'मुळे ४२ गुन्हे उघडकीस

गेल्या वर्षभरात रायगड पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात पाच हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहे. सध्या १२ हजार ९३ कॅमेरे चालू आहेत. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमुळे ४२ गुन्हे उघडकीस आणण्यात यश आले. येत्या वर्षभरात हा आकडा २५ हजारावर नेण्याचा आमचा प्रयत्न आहे. महाड तालुक्यात येणाऱ्या नैसर्गिक आपत्तीचा विचार करून तेथे संपर्क यंत्रणा सशक्त केली जाणार आहे. १ जूनपासूनच महाड शहरात एक नियंत्रण कक्ष सुरू करण्यात येईल. तो २४ तास सुरू राहील, असे पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांनी सांगितले.



२०२१मध्ये ३८ खुनाचे गुन्हे नोंदवले गेले. त्यापैकी ३७ गुन्हे उघडकी आले. एक दरोडा टाकण्यात आला होता तो उघडकीस आला. २३ जबरी चोरीचे गुन्ह दाखल झाले होते. त्यापैकी १३ उघडकीस आले. १६१ घरफोड्या झाल्या. त्यातील ७८ उघडकीस आले. ४०८ चोरीच्या प्रकरणांपैकी २२४ उघडकीस आणण्यात यश आले. २०२१ मध्ये सत्र न्यायालयात १०८ खटल्यांचे निकाल लागले. त्यापैकी २६ आरोपींना शिक्षा झाली.

महिला अत्याचाराचे १४७ गुन्हे दाखल झाले. त्यापैकी १४१ उघडकीस आणून आरोपींना अटक करण्यात आली. मोटार वाहनांवर कारवाई करून चार कोटी ३० लाख ३० हजार ७०० रुपये दंड वसूल करण्यात आला. २७२ बेवारस मोटार वाहनांचा लिलाव करून ३४ लाख १० हजार रुपये जमा करण्यात आले. चोरीस गेलेल्या मुद्देमालापैकी ५५ लाखांचा मुद्देमाल जप्त करून मूळ मालकांना परत देण्यात आला, अशी माहिती दुधे यांनी दिली.

## अवैध मासेमारीप्रकरणी अलिबागेत तीन नौका जप्त

### मत्स्य विभागाने केली कारवाई

**अलिबाग : प्रतिनिधी**

समुद्रात एलईडी आणि पर्ससीनच्या माध्यमातून मासेमारी करण्यास शासनाची बंदी असतानाही काही मच्छीमार हे अवैधपणे मासेमारी करीत असतात. अलिबाग समुद्रात अशी अवैध मासेमारी करणाऱ्या साखर आक्षी बंदरातील एक एईडी तर दोन पर्ससीन करणाऱ्या तीन बोटीवर कारवाई करून मत्स्य विभागाने जप्त केल्या आहेत. तीनही नौका मालकांवर मत्स्य विभागाकडून कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे.

सागरी मासेमारी नियमन (सुधारणा) अध्यादेशास नुकत्याच पार पडलेल्या हिवाळी अधिवेशनात राज्य विधिमंडळाची मान्यता मिळाल्यानंतर राज्य सरकारचा मत्स्यव्यवसाय विभाग अवैध मासेमारी विरोधात कमालीचा सक्रीय झालेला दिसून येत आहे. सिंधुदुर्गनंतर आता रायगड जिल्ह्यातही एलईडी आणि अवैध मासेमारी विरोधात मत्स्य विभागाने मोहीम हाती घेतली आहे. मत्स्यव्यवसाय मंत्री अस्लम शेख यांनी सुधारित सागरी अध्यादेशाची अंमलबजावणी करण्याचे आदेश विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले होते.

साखर आक्षी बंदराच्या हद्दीत अवैधपणे एलईडी आणि पर्ससीनद्वारे मासेमारी सुरू असल्याची माहिती मत्स्य विभागाला मिळाली होती. बंदरात अवैधपणे मासेमारी करताना मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, मुंबई संजय माने यांच्यासह परवाना अधिकारी. तुषार वाळूज, सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी गणेश टेमकर, महादेव नांदोस्कर यांच्या पथकाने एक एलईडी आणि दोन पर्ससीन नौका पकडल्या. एलईडी धारण केलेली दत्त साई (आयएनडी-एमएच-३ एमएम-२३२) ही पर्ससीन नौका, वैभव लक्ष्मी प्रसन्न (आयएनडी-एमएच-३ एमएम-२२५०) ही अवैध पर्ससीन नौका, तसेच आणखी एक अवैध पर्ससीन नौका ज्यावर नाव व क्रमांक नाही, अशा तीन नौका मत्स्य विभागाच्या पथकाने जप्त केल्या आहेत. प्रादेशिक उपायुक्त, मत्स्यव्यवसाय महेश देवरे जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना त्यांच्या मार्गदर्शनानुसार ही कारवाई करण्यात आली.

पकडलेल्या नौका मालकांवर याबाबत नवीन कायद्यानुसार अवैध एलईडी वापरल्यापोटी पाच लाख रुपये दंड व नौका, जाळे व इतर साहित्य जप्त करण्याची तरतूद आहे, तसेच अवैध पर्ससीन मासेमारीस एक लाख रुपये दंडाची तरतूद आहे. जिल्ह्यात पुन्हा एकदा अवैध एलईडी आणि पर्ससीन मच्छीमार नौकावर कारवाईचा बडगा उचलला गेला असल्याने भविष्यात ही मासेमारी बंद होईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

## उरणमध्ये सरकार सेवा केंद्राचे उद्घाटन

**उरण : वार्ताहर**

उरण चारफाट्याजवळ शिवसई या नावाने आपले सरकार सेवा केंद्राचे उद्घाटन उरणचे महसूल नायब तहसीलदार नरेश पेढवी यांच्या हस्ते मंगळवारी (दि. ४) झाले. शिवसई आपले सरकार सेवा केंद्राचे संचालक स्वाती मिथुन म्हात्रे यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत केले.

शिवसई आपले सरकार सेवा केंद्रामध्ये सर्व प्रकारचे दाखले मिळतील त्याचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन पेढवी यांनी केले. या वेळी तहसील कार्यालयातील शिवनाथ गिरी, कुंजल पाटील, स्वाती मिथुन म्हात्रे, चाणजे ग्रामपंचायत सदस्या उज्ज्वला



जगदीश म्हात्रे, जगदीश म्हात्रे, गणेश म्हात्रे, माजी सर्कल अधिकारी अनिल म्हात्रे, रूपेश पाटील, ॲड. प्राची पाटील, हरेश्वर ठाकूर, समीर थळी, मिथुन म्हात्रे, नितेश घरत, सुनील म्हात्रे, सचिन ठाकूर, अविनाश चोरघे, जिजा चोरघे, सचिन ठाकूर, दीपक हिंगमिरे, कमलाकर म्हात्रे, सुनील म्हात्रे आणि परिवार आदी उपस्थित होते.

या केंद्रामध्ये उत्पन्नाचा दाखला, नॉन क्रिमिलेअर, डोमेसाईल दाखला, स्थानिक रहिवासी दाखला, जातीचा दाखला, ज्येष्ठ नागरिक दाखला, संमती पत्र, पॅन कार्ड, जात पडताळणी अर्ज, गुमास्ता, फूड परवाना, राजपत्र, ई-सातबारा उतारा, प्रॉपर्टी कार्ड, शेतकरी दाखला, संजय गांधी निराधार योजना, तसेच विविध प्रकारची सेवा दिली जाईल, असे शिवसई आपले सरकार सेवा केंद्राचे संचालक स्वाती मिथुन म्हात्रे यांनी सांगितले.

## नेरळमध्ये अल्पवयीन मुलीला पळवून नेणारा अटकेत

**कर्जत : बातमीदार**

नेरळ येथील अल्पवयीन मुलीला पळवणाऱ्या तरुणाला ग्रामस्थांच्या मदतीने नेरळ पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

कर्जत तालुक्यातील नेरळ शहरातील टेपआळी येथे राहणारी १३ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही ३ जानेवारीला घरातून कम्प्युटर क्लासला जाण्यास निघाली होती. त्या वेळी ती माउली मेडिकलजवळ आल्यावर तिला फूस लावून एका व्यक्तीने (एमएच ४६ सीबी ४६२५) या स्कुटीवरून पळवून नेले होते. याबाबत मुलीच्या पालकाने नेरळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. ग्रामस्थासह मुलीच्या नातलगांनी सीसीटीव्हीच्या माध्यमातून शोध घेत त्या व्यक्तीला पकडले असता प्रथम चोप देत नेरळ पोलिसांच्या ताब्यात दिले. आरोपी प्रवीण सपकाळ (वय ४२) असे आरोपीचे नाव असून त्याच्यावर वेगवेगळ्या ठिकाणी गुन्हे दाखल आहेत. काही गुन्ह्यात तो पोलिसांच्या हातावर तुरी देत फरारदेखील झाला होता. आरोपीचे दरोडा आणि मुली पळवून नेणाऱ्या गुन्हेगारीच्या टोळीच्या ग्रुपशी संबंध असल्याची माहिती मिळाली आहे.

## खारघरमधील आंतरराष्ट्रीय स्टेडिअमचे काम अंतिम टप्प्यात

**खारघर : प्रतिनिधी**

मुंबईतील बीकेसीच्या धर्तीवर खारघर येथे अत्याधुनिक दर्जाचे कार्पोरेट पार्क (केपीसी) उभारण्याचे काम सिडकोमार्फत नियोजित आहे. या पार्कचा आराखडा तयार करण्यासाठी सिंगापूरच्या इकॉनिमिक्स डेव्हलपमेंट बोर्ड (ईडीबी) या शासकीय कंपनीची नियुक्ती करण्याचा निर्णय सिडकोने घेतला आहे. याच ठिकाणी शेकडो एकरवर आंतरराष्ट्रीय फुटबॉल स्टेडिअम उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात असल्याने खारघरमधील या मैदानात आंतरराष्ट्रीय फुटबॉलचे सामनेदेखील खेळवले जाणार आहेत.

सिडकोच्या माध्यमातून खारघर शहरात मोठमोठे आंतरराष्ट्रीय प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. यात प्रामुख्याने सेंट्रल पार्क, गोल्फ कोर्स, नवी मुंबई मेट्रो या पार्श्वभूमीवर बीकेसीच्या धर्तीवर खारघरमध्ये आंतरराष्ट्रीय वाणिज्य संकुल उभारण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यानुसार खारघर येथील सेंट्रल पार्कच्या बाजूला १५५ हेक्टर जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे कॉर्पोरेट पार्क उभारण्याचा निर्णय जानेवारी २०१६मध्ये घेण्यात आला होता. याच ठिकाणी फुटबॉलचे भव्य स्टेडियम उभारले जात आहे. भव्य अशा चार मैदानांपैकी दोन मैदानात आंतरराष्ट्रीय रग्बी आणि फुटबॉल स्पर्धा भरविण्याचा सिडकोचा मानस आहे.

हे मैदानात उभारण्यासाठी सिडकोने २२ कोटींपेक्षा जास्तीचा निधी खर्च केला आहे. पुढील वर्षी होणाऱ्या महिला फुटबॉल विश्वचषकाच्या रंगीत तालिमी याच मैदानात पार पडणार आहे. भारतात महिला फुटबॉल विश्वचषक स्पर्धा पार पडणार असल्याने या मैदानामुळे खारघर शहराचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचणार आहे.

### दुखवटा



**शांताराम कडू**

**उरण :** तालुक्यातील चाईल्ड केअर सामाजिक संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष विकास कडू यांचे वडील शांताराम पांडुरंग कडू (वय ७०) यांचे शनिवारी (दि. १) निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन सुना, एक मुलगी, एक जावई, पाच नातवंडे असा त्यांचा कुटुंब परिवार आहे. शांताराम कडू हे करळ ग्रामस्थ मंडळाचे माजी खजिनदार होते. करळ, सावरखार, सोनेरी, जसखार गावातले ग्रामस्थ मंडळाचे पदाधिकारी, ग्रामस्थ, नातेवाईक यांच्या उपस्थितीत करळ ग्रामपंचायत येथील स्मशानभूमीत कै. शांताराम कडू यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.


**ग्रामपंचायत पालीदेवद**
**मु. पालीदेवद (सुकापूर) ता. पनवेल, जि. रायगड**
**जाहीर निविदा**

पालीदेवद ग्रामपंचायत हद्दीतील खालील विकासकामे करण्याकरिता विहीत मुदतीमध्ये नोंदणीकृत ठेकेदाराकडून मोहोरबंद पाकीटात निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | निविदा फॉर्म मिळण्याची मुदत | निविदा फॉर्म मिळण्याची अंतिम मुदत | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत पालीदेवद हद्दीतील मौजे पालीदेवद येथील सांडपाणी व घनकचरा वांधकाम करणे. | २६६६५३.०० | २६६७ | ०६/०१/२०२२ | १२/०१/२०२२ | |
| २ | ग्रामपंचायत पालीदेवद हद्दीतील मौजे शिलोत्तर रायचूर येथील सांडपाणी व घनकचरा वांधकाम करणे. | २६६६५३.०० | २६६७ | ०६/०१/२०२२ | १२/०१/२०२२ | |

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे :**
१. वरील कामाच्या निविदा मोहोरबंद पाकीटात मा. सरपंच ग्रामपंचायत पालीदेवद यांचे नावे दिनांक १२/०१/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये ग्रामपंचायत कार्यालयात स्विकारण्यात येईल.
२. ठेकेदार नोंदणीकृत असावा.
३. कोणतीही एक किंवा सर्वच निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.
४. ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा दिनांक १२/०१/२०२२ रोजी दुपारी ४.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मा. सरपंच यांच्या समक्ष उघडण्यात येईल.
५. कोणत्याही नामंजूर निविदेसंदर्भात संबंधीत ठेकेदारास कुठलाही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
६. सदर कामाचे अंदाजपत्रक व तांत्रिक मान्यतेचे आदेश ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

ठिकाण : पालीदेवद
दिनांक : ०४/०१/२०२२

सही/-
**श्री. सुदिन धनाजी पाटील**
ग्रामविकास अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद
ता. पनवेल, जि. रायगड

सही/-
**सौ. योगिता राजेश पाटील**
**सरपंच,** ग्रुप ग्रामपंचायत
मु. पालीदेवद (सुकापूर)
ता. पनवेल, जि. रायगड

# नवी मुंबईत कोरोनाचा प्रादूर्भाव वाढला

## एकाच दिवसात आढळले १०७२ रुग्ण ▮ कोविड सेंटर्स पुन्हा सुरू

**नवी मुंबई : बातमीदार**

मागील आठवड्याभरापासून नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील कोरोना बाधितांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढताना दिसत असून २६ डिसेंबरपासून रुग्णवाढीस सुरुवात झाली आहे. मंगळवारी (दि. ४) १०७२ रुग्ण पॉझिटिव्ह आढळले आहेत. आशा परिस्थितीत आयुक्त बांगर यांनी शहरातील सर्व कोविड सेंटर्स पुन्हा सुरू केले आहेत.

कोविड सेंटर्स सुरू करताना त्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून घेण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश देत याकरिता वॉक इन इंटरव्ह्यू आयोजित करावा. मागील तात्पुरत्या स्वरूपाच्या भरतीच्या वेळी प्रतीक्षा यादीवर असणाऱ्या उमेदवारांना पाचारण करावे, असेही आयुक्तांनी निर्देशित केले. याशिवाय रुग्णसंख्येचा वाढता आलेख लक्षात घेऊन आवश्यक औषध पुरवठाही तातडीने उपलब्ध करून घेण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

वॉररूममार्फत बेड्स उपलब्धता व रुग्णवाहिका उपलब्धतेसाठी दुसऱ्या लाटेत अडचणीच्या स्थितीतही नागरिकांना मोठ्या प्रमाणावर मदत झाली. हीच भूमिका कायम ठेवत वॉररूमही पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याचे आदेश आयुक्तांनी या वेळी दिले.



### विशेष कक्ष कार्यान्वित करण्याबाबत सूचना

*सिडको कोविड सेंटरमध्ये मुलांसाठी विशेष कक्ष कार्यान्वित करण्याचे निर्देशित करण्यात आले आहे. आवश्यकता भासल्यास राजमाता जिजाऊ रुग्णालय ऐरोली येथे निर्माण करण्यात आलेला मुलांसाठीचा विशेष कक्ष सुरू करण्यासाठी तयारीत राहण्याचेही आयुक्तांनी सूचित केले. ओमायक्रॉन व्हेरिएंट संशयित रुग्णांना सिडको कोविड सेंटरमध्ये उपचारासाठी स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आला आहे.*

### ऑक्सिजनच्या पुरवठ्याचे नियोजन

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमध्ये जाणवलेली ऑक्सिजनची कमतरता लक्षात घेऊन नवी मुंबई महापालिकेने प्रतिदिन दोन टन क्षमतेचे ४ पीएसए ऑक्सिजन प्लान्ट वाशी सार्वजनिक रुग्णालय, ऐरोली रुग्णालय, बेलापूर माता बाल रुग्णालय व सिडको कोविड सेंटर येथे उभारले आहेत. याशिवाय पालिकेकडे २०० ड्युरा सिलेंडर आहेत. त्याचप्रमाणे एकूण ९३ केएल क्षमतेचे (१०३ मेट्रिक टन) पाच लिक्विड ऑक्सिजन स्टोरेज टँक उभारण्यात आलेले आहेत. हे ऑक्सिजन टँक भरून ठेवावेत, असे निर्देश आयुक्तांनी या बैठकीत दिले, तसेच कोविड केअर सेंटर्समध्येही ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर उपलब्ध करून ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या.

# पनवेल मनपा हद्दीतही ५०० स्क्वेअर फुटापर्यंतच्या मालमत्तांना कर माफ करा

## ▮ नगरसेविका दर्शना भोईर यांची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका हद्दीतील ५०० स्क्वेअर फूटपर्यंतच्या मालमत्तांना कर माफ करण्यात यावा, अशी मागणी नगरसेविका दर्शना भोईर यांनी पनवेल महापालिकेकडे केली आहे. या संदर्भात त्यांनी महापौर डॉ. कविता चौतमोल व सभागृह नेते परेश ठाकूर यांना निवेदन दिले आहे. महापालिकेने याबाबतचा प्रस्ताव तयार करून तो राज्य शासनाकडे पाठवावा आणि शासनाने मुंबई, नवी मुंबई व इतर महापालिकांप्रमाणेच पनवेल महापालिका हद्दीतील ५०० स्क्वेअर फूटपर्यंतच्या मालमत्तांचा कर माफ करावा, अशी नगरसेविका भोईर यांची मागणी आहे.

पनवेल महापालिका २०१६मध्ये स्थापन होऊन आता पाच वर्षे पूर्ण होत आहेत. या पाच वर्षांत महापालिकेने नागरिकांना मालमत्ता करांसदर्भात बिल अथवा नोटिसा दिल्या नव्हत्या, परंतु महापालिका हद्दीतील नागरिकांना सन २०१६पासून मालमत्ता कराची बिले पाठविण्यात आलेली आहेत. अचानकपणे एकदाच आलेला पाच वर्षांचा मालमत्ता कर नागरिकांसाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक भूर्दंड असल्याचे वाटते. त्याचबरोबर कोविड-१९ची सद्यस्थिती पाहता नागरिकांना प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन मुंबई व इतर महापालिकांना ५०० स्क्वेअर फूटपर्यंतच्या मालमत्तांचे कर माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. याच धर्तीवर पनवेल महापालिकेसाठीही असा निर्णय घेतल्यास येथील ५०० स्क्वेअर फूटपर्यंतच्या मालमत्ताधारकांना व गोरगरीब जनतेला दिलासा मिळेल, जेणेकरून आर्थिक परिस्थिती सुदृढ नसलेल्या नागरिकांना त्यापासून नाहक त्रास सहन करावा लागणार नाही.

या विषयाचे महत्त्व लक्षात घेता पनवेल महापालिका हद्दीतील ५०० स्क्वेअर फूटपर्यंतच्या मालमत्ताधारकांचे कर माफ करण्याकरिता आपल्या स्तरावर योग्य तो निर्णय घेण्यात यावा, असे नगरसेविका दर्शना भोईर यांनी महापालिकेला दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

# आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते दिनदर्शिकेचे प्रकाशन

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा नोडमधील भाजप युवा नेते पांडुरंग आमले यांनी प्रकाशित केलेल्या दिनदर्शिकेचे प्रकाशन बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते महापालिका मुख्यालयात मंगळवारी (दि. ४) करण्यात आली.

दिनदर्शिकेचे प्रकाशन करताना आमदार मंदा म्हात्रे यांनी कोरोना काळातही पांडुरंग आमले यांनी केलेल्या सामाजिक कार्याची प्रशंसा करताना त्यांनी याहीपुढे जावून आपल्या सामाजिक कार्याच्या कक्षा विस्ताराव्यात, असे आवाहन केले.



प्रकाशन सोहळ्यात भाजपचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, जिल्हा महामंत्री निलेश म्हात्रे, महामंत्री डॉ. राजेश पाटील, ज्येष्ठ माजी नगरसेवक डॉ. जयाजी नाथ, अशोक गुरखे, आयटीसेलचे संयोजक पंकज दळवी, सामाजिक कार्यकर्ते देवनाथ म्हात्रे, सानपाडा-जुईनगर महिला आघाडी अध्यक्ष आज्ञा गव्हाणे, सानपाडा-जुईनगर मंडळ पदाधिकारी निलेश वर्पे, सुलोचना निंबाळकर, मंगल वाव्हळ, साईभक्त सेवा मंडळाचे खजिनदार प्रथमेश माने, सहसचिव विनायक काबुगडे उपस्थित होते.

# रेशन कार्डधारकांसाठी मेरा रेशन मोबाइल ॲप

**खारघर : प्रतिनिधी**

मोदी सरकारने रेशन कार्ड धारकांसाठी भारतात मेरा रेशन नावाचे मोबाईल ॲप लाँच केले आहे. ज्यामध्ये गरजू म्हणजेच गरीब कुटुंबातील लोकांना फेअर प्राईज शॉप सोबत रेशन कार्डमध्ये आपली सध्याची स्थिती आणि रेशन कार्ड धारकांना मिळणाऱ्या सुविधांबाबत सर्व माहिती मिळू शकणार आहे.

मेरा रेशन ॲप हे अँड्रॉइड स्मार्टफोनसाठी लाँच करण्यात आले आहे. त्यामुळे गुगल प्ले स्टोरवरून युजर्स हे डाऊनलोड करू शकतात. सध्याच्या घडीला कुटुंबातील एका सदस्याकडे तरी स्मार्टफोन असतो. त्यामुळे मोबाईलवर सरकारी योजना आणि मिळणारा लाभ याची पूर्ण माहिती मिळू शकते, मात्र ऑनलाइन ॲपची प्रभावी अंमलबजावणी होणेदेखील तितकेच गरजेचे आहे.

मेरा रेशन मोबाइल ॲपचा वापर करणे सोपे आहे. सर्वप्रथम हे ॲप डाऊनलोड करा. गुगल प्ले स्टोरवर तुम्हाला सेंट्रल एइपीडीएस टीमद्वारा डेव्हलप केलेले ॲप मिळेल. डाऊनलोड झाल्यानंतर आपला मोबाइल नंबर यात रजिस्टर करा. रजिस्टर झाल्यानंतर तुमचे रेशन कार्ड नंबर मागितले जाईल. नंबर टाकल्यानंतर सबमिट करा. मग रेशन कार्डसंबंधी सर्व माहिती मिळू शकेल, तसेच या ॲपवर युजर्सना गेल्या सहा महिन्यातील ट्रान्झॅक्शन आणि आधार सीडिंगची पूर्ण माहिती तुम्हाला मोबाइलवर मिळू शकेल.

नव्या कार्डसाठी या ॲपवर अर्ज करता येणार आहे, मात्र प्रत्यक्ष पुरवठा विभागात अर्ज दिल्यास त्यावर लवकर कारवाईची शक्यता आहे.

मेरा रेशन ॲपमुळे देशभरात एकाच रेशनकार्ड वरून वेगवेगळ्या ठिकाणी घेतल्या जाणाऱ्या धान्यांच्या प्रकारावर आळा बसणार आहे. आपल्या जिल्ह्याच्या रेशनकार्ड धारकांची माहिती या ॲपवर इन्स्टॉल करण्यात आली आहे. स्थलांतरित रेशनकार्ड धारकांना याचा लाभ होणार आहे, असे रायगड जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके यांनी सांगितले.

**पनवेल तालुक्यातील रेशन कार्डधारक**

अंत्योदय - ६०९४
एपीएल शेतकरी - ४०६९३
प्राधान्य - ६२३६०

# दाम्पत्याची फसवणूक

**नवी मुंबई :** लॉज बुक करून देण्याच्या बहाण्याने सायबर चोराने नेरूळमधील सिंग दाम्पत्याकडून २२,५०० रुपये उकळले. नेरूळ पोलिसांनी या प्रकरणातील सायबर चोराविरोधात गुन्हा दाखल करून शोध सुरू केला आहे.

सिंग दाम्पत्याने गुगलवरून लॉजचा शोध घेताना एका वेबसाइटवर संपर्क साधला असता, चोरांनी ईएल लॉजमध्ये आठ लोकांसाठी बुकिंगसाठी रक्कम उकळली. त्यानंतर दाम्पत्याने लोणावळ्यातील ईएल लॉजवर संपर्क करून विचारणा केल्यावर बुकिंग झाली नसल्याचे सांगण्यात आले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच दाम्पत्याने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# रसायनीत रेझिंग डेनिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते २ जानेवारी १९६१ रोजी महाराष्ट्र पोलीस दलाला स्वतंत्र ध्वज देण्यात आला. तेव्हापासून हा दिवस 'रेझिंग डे'म्हणून साजरा केला जातो. या रेझिंग डे दिवसांत विविध उपक्रम पोलीस ठाण्यामार्फत होतात. रसायनी पोलीस ठाण्याच्या वतीने मोहोपाडा येथील जनता विद्यालयात बुधवारी (दि. ५) रेझिंग डे सप्ताह साजरा करण्यात आला. या अनुषंगाने पोलीस ठाण्यामार्फत विद्यार्थ्यांना विविध शस्त्रांची माहिती देण्यात आली.



यामध्ये ७.६२ एमएम एसएलआर, ९ एमएम पिस्तल, आरोपी बेडी, राऊंड आदी वेपनवर रसायनी पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक विनोद वायंगणकर यांनी माहिती दिली. कोणीही बँकविषयक माहिती मागत असल्यास देऊ नये. एखादी गोष्ट घडल्यास पोलिसांना संपर्क साधावा, असे मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांच्या हातात शस्त्र देऊन त्यांच्या शंकांचे निरसनही करण्यात आले.

महिला पोलीस कर्मचारी नेहा जाधव यांनी मार्गदर्शन करताना कोरोनावर मात करण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी मास्क, सॅनिटायझर व सोशल डिस्टन्सिंग ठेवले पाहिजे. शिवाय अपघात झाल्यास त्या ठिकाणी उपस्थित राहून मदत करावी, असे आवाहन केले. या वेळी विद्यार्थ्यांना करिअर गाइडन्स केले. पोलिसांची भीती बाळगू नये. एखादी तक्रार द्यायची झाल्यास पोलीस ठाण्यात यायला घाबरू नका. तक्रारीचे निराकरण केले जाईल. मुलींनी कशाप्रकारे सावधानता बाळगली पाहिजे. ओळखीतून कसे गैरप्रकार केले जातात याची माहिती दिली, तर पोलीस नाईक विशाल झावरे व मंगेश लांगी यांनी विद्यार्थ्यांना शस्त्र कसे हाताळावे याचे मार्गदर्शन केले. या वेळी शालेय शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

# स्वच्छतादूतांना मोफत धनुर्वात इंजेक्शन सुविधा

## नगरसेविका नेत्रा पाटील यांचा उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

खारघर प्रभाग ४ मध्ये स्वच्छता राखण्यासाठी नेहमी कार्यतत्पर असलेल्या स्वच्छतादूतांना डॉ. रामकृष्ण क्षार यांच्या सुमनकांता चाईल्ड व ॲडल्ट क्लिनिक यांच्या वतीने मोफत धनुर्वात (टीटी) इंजेक्शन देण्यात आले. पनवेल महापालिकेच्या प्रभाग क्रमांक ४च्या नगरसेविका नेत्रा पाटील यांनी हा उपक्रम राबवला. या वेळी जवळपास ८० स्वच्छतादूतांना ही लस देण्यात आली.

स्वच्छतादूत विभागात स्वच्छता, साफसफाई करत असताना नकळतपणे कुठेतरी खिळे अथवा इतर काही टोकदार वस्तुमुळे इजा होत असते व त्याकडे दुर्लक्ष केल्यास एखाद्या मोठ्या आजाराला सामोरे जावे लागते. त्यासाठीच स्वच्छतादूतांनी वेळोवेळी टीटी लसीकरण करणे गरजेचे आहे. ही बाब लक्षात घेत नगरसेविका पाटील यांनी या उपक्रमाचे आयोजन केले होते.



या वेळी पनवेल महापालिकेचे स्वच्छता निरीक्षक अतुल मोहोकर, पर्यवेक्षक जितेंद्र जाधव व साई गणेश एंटरप्राइजेसचे सुपरवायझर विश्वास पाटील व गणेश भोईर उपस्थित होते. स्वच्छता मित्र आपल्या स्वतःची काळजी न करता शहरातील राहिवाशांच्या आरोग्याची काळजी घेत स्वच्छता करत असतात. अशा वेळी कुठेतरी त्यांच्यादेखील शरीर स्वास्थ्याची काळजी घेणे गरजेचे असल्याचे सांगितले. तीच बाब लक्षात घेता एक जबाबदार लोकप्रतिनिधी म्हणून माझीदेखील ती जबाबदारी आहे. प्रभागातील सर्व स्वच्छतादूतांना धनुर्वातचे इंजेक्शन मोफत देण्यात आले. यापुढेदेखील असा उपक्रम सुरू राहील, असे नगरसेविका नेत्रा पाटील यांनी सांगितले.

## १५ ते १८ वयोगटाचे कोरोना लसीकरण

# उरणमध्ये दोन दिवसांत १२५० विद्यार्थी लसवंत

**उरण : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या आदेशानुसार १५ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांच्या लसीकरणाला सोमवार (दि. ३) पासून सुरुवात करण्यात आली आहे. दोन दिवसांत उरणधील आठ विद्यालयामधील जवळ जवळ १२५० विद्यार्थ्यांना लसीकरण करण्यात आले, अशी माहिती उरण आरोग्य अधिकारी राजेंद्र इटकरे यांनी दिली आहे.

कोरोनाने दोन वर्षे हाहाकार माजला आहे. त्यावर प्रतिबंधक उपाय म्हणून अनेक उपाययोजना करीत आहेत. यातील लसीकरण या उपाययोजनेतील मोहिमेत १५ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांचे लसीकरण करण्याचे ठरविण्यात आले असून त्याला सुरुवातही झाली.

विद्यार्थ्यांचे लसीकरण करण्यासाठी उरणची आरोग्य यंत्रणा सज्ज झाली आहे. तुकाराम हरी वाजेकर फुंडे, रामचंद्र म्हात्रे विद्यालय आवरे, छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय जासई, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय पिरकोन, उरण शहरातील एनआय हस्यस्कूल अशा पाच शाळांमध्ये लसीकरण होत आहे. प्रत्येक शाळेमध्ये आरोग्य अधिकारी आरोग्य सहाय्यक, आरोग्य परीवेक्षक परिचारिका असे नियोजन करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांसोबत वेळेवर विद्यालयात हजेरी लावली होती. यासाठी विद्यालयांकडून उत्तम असे नियोजन लसीकरणासाठी करण्यात आले होते. विद्यार्थ्यांचे लसीकरण करण्यासाठी तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांनी आरोग्य विभाग आणि शाळेतील प्राचार्य यांची बैठक घेऊन सर्व माहिती देण्यात आली होती.



# पाच लाख वनौषधी बियांचे वाटप

## सुधीर पाटील यांचा पर्यावरण संवर्धन उपक्रम

**पनवेल : वार्ताहर**

आपण निसर्गाचे देणे लागतो या उक्तीप्रमाणे काही माणसे निरपेक्ष भावनेने सामाजिक कार्यात स्वतःला वाहून घेतात. असेच एक पर्यावरणप्रेमी म्हणजे पत्रकार सुधीर नामदेव पाटील. यांनी तब्बल पाच लाख वनौषधी बियांचे वाटप करून समाजापुढे पर्यावरण संवर्धनाचा आदर्शच ठेवला आहे.

निसर्गाच्या संरक्षणाचा ध्यास लागलेल्या सुधीर पाटील यांनी जवळ जवळ १५० प्रकारच्या वनौषधी झाडांच्या बियांचे वाटप केले. विशेष म्हणजे यामध्ये देशी वृक्षांच्या बियांचे प्रमाण अधिक होते. सुधीर पाटील यांनी चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, वनौषधी परिचय शिबिरे, वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन, चर्चासत्रे आदी कार्यक्रम राबवून त्यांनी पर्यावरण संवर्धनासाठी नागरिकांना प्रोत्साहित केले आहे. गेल्या १० वर्षांत २००० पेक्षाही अधिक मोफत वनौषधी परिचय शिबिरे त्यांनी घेतली आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना मेडिसिनल प्लॅन्ट मॅन, पर्यावरण मित्र, वन मित्र, वनौषधी मित्र यासारख्या अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

सुधीर पाटील यांनी आजपर्यंत हजारो झाडे लावली आहेत. वनौषधी झाडे लागवड, संवर्धन त्यांची माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत कशी पोहचविता येईल हा त्यांचा हेतू असतो. पर्यावरण संवर्धनाचे हे व्रत प्रत्येकानेच कायम अंगिकारले पाहिजे, असे सुधीर पाटील यांचे म्हणणे आहे.

# ऐरोली-काटई नाका रस्त्याबाबत बैठक

**नवी मुंबई : बातमीदार**

मुंबई महानगर प्रदेश विकास महामंडळामार्फत बांधण्यात येणाऱ्या ऐरोली ते काटई नाका या रस्त्याचे काम प्रगतिपथावर असून डिसेंबर २०२२पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या कामामध्ये येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी व नियोजनामध्ये अतिरिक्त सुविधा समाविष्ट करण्याच्या दृष्टीने नवी मुंबई महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्यामार्फत महापालिका व एमएमआरडीए यांच्या संबंधित अधिकाऱ्यांची विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती.

नवी मुंबईतील घणसोली, रबाळे, ऐरोली, दिघा परिसरातील वाहनचालकांना कल्याण-डोंबिवलीच्या दिशेने प्रवास करण्यासाठी प्रामुख्याने शिळफाटा-महापे मार्गाने वळण घेऊन प्रवास करावा लागतो. त्यामुळे मुंबई आणि नवी मुंबईतून कल्याण-डोंबिवलीच्या दिशेने प्रवास करताना घ्यावा लागणारा द्राविडी प्राणायाम टाळण्यासाठी ऐरोली-काटई नाका अशा उन्नत आणि भूमिगत मार्गाची निर्मिती एमएमआरडीएच्या माध्यमातून केली जात आहे.

या रस्त्याचे काम सुरू असून नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील ठाणे, बेलापूर मार्गावर सेक्टर ३ ऐरोली येथील महापालिकेकडे हस्तांतरित असलेल्या जागांमधील या प्रकल्पासाठी एमएमआरडीएला आवश्यक असणाऱ्या जागा उपलब्ध करून देण्याबाबत या बैठकीत सविस्तर विचारविनिमय करण्यात आला. यामध्ये सेक्टर ३ ऐरोली येथील उद्यानाचा काही भाग, अग्निशमन केंद्र परिसराचा काही भाग, तसेच ऐरोली बस डेपोचा काही भाग उपलब्ध करून देण्यास व काम झाल्यानंतर तो पूर्ववत करण्याचे एमएमआरडीएमार्फत मान्य करण्यात आले.

ठाणे-बेलापूर रोडवरून मुलुंडमार्गे मुंबईत जाण्यासाठी व मुलुंडकडून ठाणे-बेलापूर रोडवर नवी मुंबईत येण्यासाठी आवश्यक असलेली मार्गिका एमएमआरडीए मार्फत नवीन नियोजनात प्रस्तावित करण्यात आलेली आहे. या कार्यवाहीची कालमर्यादा निश्चित करण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या मार्गिकांची तांत्रिक व्यवहार्यता तपासून १५ जानेवारीपर्यंत अंतिम अहवाल सादर करण्याचे आयुक्तांमार्फत प्रकल्प सल्लागार यांना सूचित करण्यात आले, तसेच याविषयी पुन्हा १८ जानेवारी रोजी एमएमआरडीए अधिकाऱ्यांसोबत बैठक घेण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानंतर पुढील कार्यवाही निश्चित करण्याकरिता एमएमआरडीएचे वरिष्ठ अधिकारी यांच्या स्तरावर बैठक आयोजनाबाबत विनंती करण्यात येणार आहे.

## संपादकीय

# नफरतीचा कळस

पंतप्रधान नरेंद्र मोदी या नावाची काँग्रेस नेत्यांना इतकी प्रचंड ॲलर्जी आहे की मोदी हे नाव उच्चारताच त्यांचे माथे फिरते. याचेच प्रत्यंतर बुधवारी पंजाबमध्ये आले असे खेदाने म्हणावे लागेल. पंजाबमधील फिरोजपूर येथील सभेला उपस्थित राहण्यासाठी पंतप्रधानांचा ताफा निघाला असताना हुसैनीवाला येथे तथाकथित किसान आंदोलकांनी 'रास्ता रोको' केला. पंतप्रधानांच्या सुरक्षा व्यवस्थेतील ही एक गंभीर चूक आहे. पंतप्रधानांची सुरक्षा ही साधीसुधी बाब नव्हे.

**विविध विचारसरणींचा संघर्ष हे लोकशाहीचे एक महत्त्वाचे सौंदर्यस्थळ आहे. भारतासारख्या खंडप्राय आणि महान लोकशाही देशामध्ये अनेक पक्षांचे लोक आपापल्या विचारसरणीनिशी झगडत असतात. परस्परांशी वितंडवाद घालत असतात. शेलक्या शब्दांचे आदानप्रदान होत असते. क्वचितप्रसंगी भाषेचा स्तरदेखील ढासळताना दिसतो, परंतु असे असले तरी विचारांचा संघर्ष हा विचारांनीच लढला जावा अशी बव्हंशी धारणा असते. त्यामध्ये द्वेष, तिरस्कार, हिंसा किंवा घातपात यांची सरमिसळ झाली की लोकशाहीचे गणित बिघडते आणि संपूर्ण व्यवस्थेचाच अराजकाकडे प्रवास सुरू होतो. सात वर्षांपूर्वी नरेंद्र मोदी नावाच्या वादळाने काँग्रेस पक्षाची देशातील सत्ता पाचोळ्यासारखी उडवली. वर्षानुवर्षे सत्तेच्या सिंहासनावर ठाण मांडून बसलेल्या, एकाच परिवाराच्या भोवती घोटाळणाऱ्या काँग्रेसजनांना भारतीय जनतेने एकदम बेदखल केले. असे काही घडेल असे त्यांच्या ध्यानीमनीदेखील नव्हते. आज काँग्रेसची अवस्था दयनीय झाली आहे. त्यात बदल होण्याची नजीकच्या भविष्यकाळात तरी शक्यता नाही. त्याचाच प्रचंड राग काँग्रेस नेत्यांच्या मनात धूमसत राहिलेला दिसतो. याचेच प्रत्यंतर बुधवारी पंजाबमध्ये आले. पंतप्रधान मोदी सभास्थानी निघाले असता त्यांच्या मार्गात कथित आंदोलकांनी केलेल्या 'रास्ता रोको'मुळे अखेर त्यांना दिशा बदलून भटिंडा येथील विमानतळ गाठावे लागले, तसेच फिरोजपूर येथील सभा रद्द करावी लागली. पंतप्रधानांना अतिविशेष सुरक्षा कवच असते. त्यांच्या दौऱ्यासाठी कमालीची काळजी घेतली जाते हे सर्वश्रुत आहे. एखाद्या राज्यात पंतप्रधानांचा दौरा असेल तर त्यांचे विशेष सुरक्षाकवच म्हणजेच स्पेशल प्रोटेक्शन ग्रुप, तसेच गुप्तचर विभागाचे अतिवरिष्ठ अधिकारी आणि संबंधित राज्याचे पोलीस दल यांच्यात समन्वय असणे आवश्यक असते, किंबहुना पंतप्रधानांच्या सुरक्षेची जबाबदारी त्या राज्याचीदेखील असते. पंजाबमध्ये मात्र बुधवारी वेगळे चित्र दिसले. सडकमार्गे फिरोजपूर येथे निघालेल्या पंतप्रधानांना शेतकरी आंदोलकांनी रोखले. त्यांच्या मार्गाची माहिती सार्वजनिक कशी झाली हा खरा प्रश्न आहे. इतकेच नव्हे तर या संपूर्ण मार्गावर पंजाब पोलिसांनी कुठलाच बंदोबस्त ठेवला नव्हता असे निष्पन्न झाले आहे. ज्या हुसैनीवाला क्षेत्रातून पंतप्रधानांचा ताफा मागे वळवावा लागला, तेथून पाकिस्तानची सरहद्द अवघ्या दहा किमी अंतरावर आहे. अशा परिस्थितीमध्ये पंतप्रधानांचा जीव धोक्यात घालण्याचे धाडस पंजाब सरकारला कसे झाले, असा प्रश्न आता विचारला जात आहे. तो योग्यच आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सुरक्षा व्यवस्थेतील घोडचूक लक्षात आल्यानंतर भारतीय जनता पक्षाने पंजाबमधील काँग्रेस सरकारवर टीकेची झोड उठवली. भाजप कार्यकर्त्यांचा हा संताप स्वाभाविकच म्हटला पाहिजे. भटिंडा विमानतळावर पोहोचल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी तेथील अधिकाऱ्यांना सांगितले की, भटिंडापर्यंत मी जिवंत पोहोचलो याबद्दल आपल्या मुख्यमंत्र्यांना धन्यवाद कळवा. पंतप्रधानांच्या या तिरकस टोमण्यानंतर तरी काँग्रेसचे द्वेषाने भरलेले डोळे उघडतील का हा खरा प्रश्न आहे.**

# बाळशास्त्री जांभेकर : मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक

**इंग्रज राजवटीत मराठी वर्तमानपत्राची मुहूर्तमेढ रोवण्याचे श्रेय दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांना जाते. मराठी वृत्तपत्राचा पाया घालून त्याची थोर परंपरा सुरू करण्याचा मान दर्पणकारांना जातो. चिपळूणकर, टिळक, आगरकर, न्या. रानडे यांचे कर्तृत्वपर्व सुरू होण्याआधी ज्या लोकोत्तर महापुरुषांनी महाराष्ट्राची सामाजिक, शैक्षणिक व आध्यात्मिक जीवनाची पायाभरणी केली, त्यांच्यात कै. बाळशास्त्री जांभेकरांचे नाव सर्वोच्च स्थानी घेतले जाते. समाज प्रबोधन हे उद्दिष्ट मनाशी बाळगून बाळशास्त्रींनी ६ जानेवारी १८३२ रोजी आपल्या 'दर्पण' या वृत्तपत्राचा शुभारंभ केला. ६ जानेवारी या पत्रकार दिनाचे औचित्य साधून मराठी पत्रकारितेचे निर्माते कै. बाळशास्त्री जांभेकर यांच्या महान कार्यावर टाकलेला हा दृष्टिक्षेप...**

मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म कोकणातील देवगड तालुक्यातील पोंभुर्ले येथे १८१२ साली झाला. आपल्या काळाच्याही पुढे दृष्टी टाकण्याची असाधारण प्रतिभा लाभलेल्या विभूतीचे एखाद्या क्षेत्रातले योगदान इतके अलौकिक असते की, ते क्षेत्र त्या व्यक्तीच्या नावाने ओळखले जाते, ते महान व्यक्तिमत्त्व म्हणजे दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर तर क्षेत्र पत्रकारिता होय. या कोकणातील एका हिऱ्याने वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी आजपासून १७७ वर्षांपूर्वी स्वातंत्र्य पूर्वकाळात अत्यंत कठीण परिस्थितीत मुंबई येथे ६ जानेवारी १८३२ रोजी 'दर्पण' नावाचे पहिले मराठी वृत्तपत्र सुरू केले आणि येथेच मराठी वृत्तपत्रसृष्टीचा पाया घातला गेला, याचा सार्थ अभिमान महाराष्ट्राला आणि विशेषत: कोकणाला आहे.

स्वदेशी लोकांमध्ये विलायतेतील विद्यांचा अभ्यास व्हावा व त्याद्वारे समाजजीवनातील अज्ञान, अंधश्रद्धेचा लोप व्हावा, हे उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून दर्पणकरांनी पत्रकारिता केली. लोकशिक्षण व समाज प्रबोधन करण्याचे व्रत घेतलेल्या बाळशास्त्रींची टीका निर्भिड व विधायक असे. त्यांचा सरकारदरबारी एवढा वचक होता की, त्यांच्या सूचनांची वेळीच दखल घेतली जात असे. एकीकडे रयतेला सज्ञान करणे, तर दुसरीकडे आपला स्वाभिमान शाबूत ठेवून ते इंग्रज सरकारला लोककल्याणार्थ योग्य सल्लाही देत असत. खरं म्हणजे दर्पणकारांना केवळ राजदरबारीच नव्हे, तर लोकदरबारीही मानाचे स्थान होते. दिग्दर्शन या आद्यमराठी मासिकाची निर्मितीही त्यांनी केली.

मुंबईचे तत्कालीन गर्व्हनर सर जेम्स कर्नाक यांनी तर दर्पणकारांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना 'जस्टीस ऑफ पीस' ही पदवी दिली होती. न्या. ना. ग. चंदावरकरांनी त्यांचा पश्चिम भारतातील आद्यऋषी म्हणून गौरव केला होता. तर बाळशास्त्रींच्या सान्निध्यात विद्यार्थी म्हणून वावरलेल्या दादाभाई नौरोजी यांनीदेखील आपल्या गुरूंचा 'प्रख्यात पंडित व अद्वितीय विद्वान' अशा आदरार्थी शब्दात महिमा गायला होता. आपले राज्य कां गेले आणि इंग्रजांचे राज्य या देशात का आले, याचे अचूक निदान करणारी महाराष्ट्रातील पहिली व्यक्ती म्हणजे दर्पणकार, असे गौरवोद्गार आचार्य अत्रे यांनी काढले होते.

व्यवसायाने शिक्षणाधिकारी असलेल्या बाळशास्त्रींनी कुलाबा वेधशाळेचे ज्योतिर्निरीक्षक, भारतीय इतिहासचे आद्यसंशोधक, रॉयल एशियाटिक सोसायटीचे निबंधकार, संस्कृत पंडित, पत्रकार, साहित्यकार, मराठी भाषेचे चिकित्सक, शब्दकोषकर्ते, ज्ञानेश्वरीचे आद्य ग्रंथप्रकाशक, आद्य समाजसुधारक, शुद्धिकर्ते, धर्मशास्त्रज्ञ, ग्रँड ज्युरी मेंबर, अक्कलकोट संस्थानचे युवराजगुरू अशा अनेक भूमिका बजावल्या.

दर्पणकारांचे मराठी, संस्कृत, बंगाली, इंग्रजी अशा नऊ भाषांवर प्रभुत्त्व होते. प्रारंभी त्यांची नियुक्ती एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये झाली. गणित विषयाचे अध्यापक, नॉर्मल स्कूलचे डायरेक्टर अशी शिक्षण क्षेत्रातील विविध पदे भूषवून त्यांनी मराठी जनमानसाला सज्ञान करण्यात आपले सारे आयुष्य वेचले. इतिहास, भूगोल, विविध भाषा यावर अनेक शालेय पुस्तके त्यांनी लिहिली. इतकेच नव्हे तर अनेक शिलालेख व ताम्रपटांचे वाचन व भाषांतर केले. समाजाला योग्य दिशा दाखविण्यासाठी शाळा व वृत्तपत्रे ही उत्तम साधने



आहेत, हे जाणून दर्पणकारांनी प्रत्येक संधीचा, प्रसंगाचा, अधिकाराचा व प्राप्त परिस्थितीचा लोकशिक्षण व समाजप्रबोधनासाठी उपयोग करून घेतला. बाळशास्त्री जांभेकर यांनी आपला १८१२-१८४६ एवढा अल्पसा जीवनकाळ समाजप्रबोधन, ज्ञानोपासना व ज्ञानदानातच व्यतित केला. वृत्तपत्र चालवितांना व्यावसायिक दृष्टीकोन व स्वहित याचा बाळशास्त्रींनी कधी विचारच केला नाही.

आद्यपत्रकार बाळशास्त्री हे महाराष्ट्रातील स्त्री मुक्तीचे प्रवर्तक म्हणूनही गणले जातात. सतीची कुप्रथा समाजातून हद्दपार करण्यासाठी सर्वप्रथम स्त्रियांमधील अज्ञान घालविले पाहिजे, हे जाणून त्यांनी पुरुषांप्रमाणेच महिलांना शिक्षण देण्यासाठी पुढाकार घेतला. समाजरोषाची पर्वा न करता जांभेकरांनी सतीप्रथा, बालविवाहविरुद्ध लढा उभारून स्त्रीशिक्षण, विधवा पुनर्विवाहाचा दर्पण या माध्यमातून पुरस्कार केला. स्त्रियांना पुरुषांइतकीच सन्मानाची वागणूक मिळाली पाहिजे, अशी आग्रही मागणी दर्पणकारांनी केली. सामाजिक सुधारणांच्या पार्श्वभूमीवर स्त्रीशिक्षणाच्या चळवळीत जांभेकर अग्रस्थानी राहिले. घराघरातील स्त्री शिकली पाहिजे, ही त्यांची भूमिका होती. कारण स्त्री आपल्या घरात जी सुधारणा आग्रहाने राबवेल, तीच समाजात रूढ होणार, अशी त्यांची पक्की धारणा होती. दर्पणकारांनी खऱ्या अर्थाने स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित केली. ज्ञान-विज्ञानाचा प्रसार व समाजाची सार्वजनिक नितिमत्ता सुधारणे हे काम वृत्तपत्राचे आहे, हे बाळशास्त्रींनी दर्पणच्या माध्यमातून लोकांच्या मनात बिंबवले.

**खबरबात**
**शैलेश पालकर**

आजच्या इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमांच्या युगात वृत्तपत्रांची विश्वासार्हता अजूनही टिकून आहे आणि यापुढे देखील टिकून राहील. आजही समाजाचे मार्गदर्शक म्हणून वृत्तपत्राकडे पाहिले जाते. त्या पार्श्वभूमीवर वृत्तपत्रे ही भूमिका जबाबदारीने पार पाडीत आहेत. भारतासारख्या विकसनशील व खंडप्राय लोकशाही राष्ट्रामध्ये वृत्तपत्रांवर मोठी जबाबदारी आहे. दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांचा वारसा लाभलेल्या मराठी पत्रकारितेला जनमानसात सदैव मान-सन्मान मिळत राहीलच, यात तसूभरही शंका नाही.

बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी पत्रकारिता अधिक समृद्ध व्हावी, यासाठी जे योगदान दिले आहे, ते लक्षात घेऊन पत्रकारांनी त्यांचा आदर्श समोर ठेवून लेखणी या आयुधाचा योग्यरीत्या वापर करावा. लोकशिक्षण व जनजागृती याकरिता सदैव तत्पर राहावे. पितपत्रकारिता करणे पूर्णत: टाळावे. लोकांना बातमीद्वारे वास्तवाचे दर्शन घडावे यासाठी सदैव प्रयत्नशील राहावे. वृत्तपत्राची विश्वासार्हता टिकून राहण्यासाठी वृत्तपत्राने जनतेसमोर खरी माहिती ठेवावी. शासन व जनता यातील दुवा म्हणून वृत्तपत्राने मध्यस्थाची भूमिका बजावावी. जनतेची दिशाभूल होईल, असे लिखाण करू नये. कुठल्याही आमिषापासून दूर राहावे. धार्मिक सदभावना व सामाजिक ऐक्य अबाधित राखण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहावे. जाती-जातीत, धर्मा-धर्मात वैमनस्य निर्माण होईल, असे लिखाण कदापि करू नये. बातमी लिहिताना सकारात्मक दृष्टिकोन बाळगावा. कुठल्याही व्यक्तीचे चारित्र्यहनन होणार नाही, याची दक्षता घ्यावी. जातीय दंगे, बॉम्बस्फोट, अतिवृष्टी, महापूर, चक्रीवादळसारख्या आपत्तींची वास्तव माहिती जनतेसमोर ठेवावी. जनतेत भीतीचे, संभ्रमाचे वातावरण निर्माण होईल, असे लिखाण करणे टाळावे. नि:पक्षपातीपणाची भूमिका बजावून सर्व जाती-धर्मातील लोकांना समान न्याय द्यावा. कोणत्याही धर्म वा जाती विरोधात लिखाण करू नये. जनकल्याणार्थ शासनाने हाती घेतलेल्या योजनांची माहिती जनतेला तत्परतेन द्यावी. कुटुंबनियोजन, हुंडाबंदी, लसीकरण, पोलिओ निर्मूलन, अंधश्रद्धा निर्मूलन, ग्राहक संरक्षण कायदा, कुपोषण निर्मूलन, वीजबचत, रक्तदान, नेत्रदान, धूम्रपान बंदी अशा लोकोपयोगी योजनांना व्यापक प्रसिद्धी देऊन वृत्तपत्रांनी जनजागृतीत आपले योगदान द्यावे, म्हणजे हीच दर्पणकार आद्यपत्रकार स्व. बाळशास्त्री जांभेकरांना खरी श्रद्धांजली ठरेल.

# कोरोना, ओमायक्रॉनविषयी मुरूड नगर परिषद सतर्क

## ■ शहरात जनजागृती, विनामास्क फिरणाऱ्यांवर कारवाईचा इशारा

**मुरूड : प्रतिनिधी**

कोरोना, ओमायक्रॉनला प्रतिबंध व्हावा, या हेतूने मुरूड नगर परिषदेतर्फे मंगळवारी (दि. ४) शहरात जनजागृती करण्यात आली. नगर परिषद कर्मचाऱ्यांनी या वेळी शहातील मोक्याच्या व गर्दीच्या ठिकाणी जाऊन कोरोनाप्रतिबंधक नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले.

मुख्याधिकारी पंकज भुसे, कार्यालयीन अधीक्षक परेश कुंभार, करनिरीक्षक नंदकुमार आंबेतकर, लेखापाल कपिल वेहेले, आरोग्य अधिकारी राकेश पाटील, नगररचना सहाय्यक साहिल मुजावर, प्रकाश आरेकर, सुदेश माळी, प्रशांत दिवेकर, अभिजित कारभारी, सतेज निमकर यांच्यासह नगर परिषदेच्या सर्व कर्मचाऱ्यांनी मंगळवारी मुरूड शहरातील मासळी मार्केट, भाजी मार्केट, बाजारपेठेत जाऊन तेथील विक्रेते व नागरिकांशी संवाद साधला व कोरोनाविषयक नियमांचे पालन करावे, असे आवाहन केले.



(छाया : संजय करडे)

> **शहरात विनामास्क फिरणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असून, नागरिकांनी मास्क घातल्याशिवाय घराच्या बाहेर पडू नये. कोरोनाविषयक नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे.**
> **-पंकज भुसे, मुख्याधिकारी, मुरूड नगर परिषद**

मुरूड नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांनी शहरातील शाळांमध्ये जावून सामाजिक अंतर, सॅनिटायझरचा वापर व मास्क वापरणे किती आवश्यक आहे, याची माहिती दिली, तसेच तेथील कर्मचाऱ्यांनी दोन डोस पूर्ण केले आहेत का, याची खात्री केली. मास्क वापरण्याची सूचना केली.

१५ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांनी लसीकरण करून घ्यावे, त्यासाठी गरज पडल्यास विशेष शिबिर लावण्यासाठी सहकार्य करण्याची ग्वाही मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी या वेळी दिली.

# स्त्रीकडे एक माणूस म्हणून पाहा -प्रा. वृषाली विनायक

**अलिबाग : प्रतिनिधी**

स्त्रीकडे स्त्री म्हणून नाही तर एक माणूस म्हणून पाहिलं पाहिजे. तिला जगण्याचे, निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे. जोपर्यंत समाजाची मानसिक प्रगती होत नाही तोपर्यंत स्त्रीला खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य मिळणार नाही, असे प्रतिपादन सामजिक कार्यकर्त्या प्रा. वृषाली विनायक यांनी केले.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९१व्या जयंतीनिमित्त कुरुळ आरसीएफ कॉलनीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या '२१व्या शतकातील सावित्रीकडून जोतिबाच्या सावित्रीच्या अपेक्षा' या विषयावरील व्याख्यानात प्रा. वृषाली विनायक बोलत होत्या. समाजाची मानसिक प्रगती करण्याचे काम घराघरातून झाले पाहिजे, असे मत त्यांनी या वेळी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उज्ज्वला वानखेडे यांनी केले. सामाजिक कार्यकत्या प्रिया ढवळे, ॲड. मानसी म्हात्रे, कायद्याने वागा लोकचळवळीचे अध्यक्ष राज असरोंडकर, ॲड. श्रद्धा ठाकूर, दादासाहेब खंडारे यांची या वेळी समयोचित भाषणे झाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आराधना गोलाईत यांनी केले. अलिबागमध्ये महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे पुतळे उभारावेत, अशी मागणी प्रा. डॉ. पी. बी. आचार्य यांनी या वेळी केली. कविता खंडारे यांनी आभार मानले.



## सीएफआय संस्थेतर्फे शिक्षकांचा गौरव

**पेण : प्रतिनिधी**

चिल्ड्रेन्स फ्युचर इंडिया (सीएफआय) या सामाजिक संस्थेतर्फे शिक्षकांकरिता इंग्रजीचा कोर्स सुरू करण्यात आला आहे. त्यामध्ये ३० शिक्षकांनी उत्तम पद्धतीने यश प्राप्त केले. त्यांना संस्थेतर्फे प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किशोर देशमुख यांनी या शिक्षकांचे अभिनंदन करून त्यांना उत्तम मार्गदर्शनही केले.

# माणगावमध्ये स्पर्धा परीक्षा केंद्राचे उद्घाटन

**माणगाव : प्रतिनिधी**

जे. बी. सावंत एज्युकेशन सोसायटीच्या माणगाव येथील टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजमध्ये बुधवारी (दि. ५) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे लेखा व वित्त अधिकारी डॉ. संजय खोब्रागडे यांच्या हस्ते करण्यात आले.



(छाया : सलीम शेख)

राज्य उच्च व तंत्रशास्त्र विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रशास्त्र सहाय्यक केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर कट्टा अंतर्गत युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी माणगाव येथील टिकमभाई मेथा महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र स्थापन करण्यात आले आहे. या केंद्रामार्फत विद्यार्थ्यांना एमपीएससी आणि यूपीएससी या स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. मार्गदर्शन केंद्रातून गेलेले काही विद्यार्थी नासा इस्त्रो, आयपीएस व इतर उच्चपदावर काम करीत असून, त्यांचा आदर्श आपण डोळ्यासमोर ठेवावा, असे आवाहन डॉ. खोब्रागडे यांनी या वेळी केले.

प्रा. मोरे यांनी प्रास्ताविकात मार्गदर्शन केंद्राविषयी माहिती दिली. प्राचार्या डॉ. संध्या कुलकर्णी, प्रा. हर्षल जोशी, अमित बाकडे यांचेही या वेळी समयोचित भाषण झाले. प्रा. निकिता मंडवकर यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि ५६ विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

# पेण, माणगावात क्रांतिज्योती सावित्रीबाईंना अभिवादन



(छाया : अनिस मनियार)

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील सावरसई येथील शासकीय व उच्च माध्यमिक शाळेत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती महिला शिक्षण दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या वेळी सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाऊ, जयसपाल सिंह मुडा यांच्या प्रतिमांचे प्रमुख पाहुणे नीरा पवार यांच्या हस्ते पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक एच. एच. पाटील, सहशिक्षिका एम. जे. माने, सी. एम. म्हात्रे, जयश्री नाईक, सुभाष नाईक, आर. डी. पाटील, के. ए. बिराजदार, एल. एन. संताने, एम. जे. माने या वेळी उपस्थित होते.

**माणगाव : प्रतिनिधी**

येथील एस. एस. निकम इंग्लिश स्कूल ॲड ज्युनिअर सायन्स कॉलेजमध्ये सोमवारी (दि. ३) क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

कोमसापच्या सदस्या सुलभाताई मदन निकम, माणगाव येथील सुयोग मतिमंद मुलांची शाळेच्या चेअरमन मीनाताई खाडे व त्यांच्या सुकन्या शिल्पा खाडे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा आढावा घेतला. त्यानंतर इयत्ता आठवीच्या विद्यार्थिनींनी शिक्षणाचे महत्त्व सांगणारे नृत्य सादर केले. प्राचार्या संगीता कोकाटे यांनी सावित्रीबाई फुले नसत्या, तर आजचे चित्र कसे असते यावर प्रकाशझोत टाकला. विभावरी जाधव यांनी कविता सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शर्मिला मुधाले यांनी केले. शाळेचे समन्वयक अधिकारी पाईकराव विजय, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक शैलेश जाधव, स्नेहल परांजपे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.





(छाया : महेंद्र खैरे)

## रायगडात गुरे चोरणारा जेरबंद
### अन्य तीन आरोपींचा शोध सुरू

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील माणगाव, गोरेगाव, तळा आणि महाड परिसरात गुरे चोरणाऱ्या टोळीतील आरोपीला जेरबंद करण्यात रायगड पोलिसांना यश आले आहे. स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने ही कारवाई केली असून अन्य तीन आरोपींचा शोध सुरू आहे.

माणगाव तालुक्यातील येलवडे येथे जनावरांची चोरी करून कत्तल केल्या प्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात एक गुन्हा दाखल करण्यात आला होता. महाराष्ट्र प्राणी सुधारणा अधिनियमांतर्गत, तळा, महाड, गोरेगाव पोलीस ठाण्यात अशाच स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले होते. त्यामुळे या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करण्याचे, तसेच आरोपींचा शोध घेण्याचे निर्देश पोलीस अधीक्षक अशोक दुधे आणि अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे प्रमुख दयानंद गावडे यांना दिले होते.

स्थानिक पोलिसांसह, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग आरोपींचा शोध घेत होते. स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस उपनिरीक्षक महेश कदम यांच्या नेतृत्वाखालील पथक या प्रकरणांचा शोध घेत असताना पोलीस हवालदार राजेश पाटील यांना एकाची माहिती मिळाली. त्यानुसार त्यांनी नेरळ दामत येथून फरहान निसार जिवारी ऊर्फ बाबा जिवारी (वय ३७) याला ताब्यात घेतले. त्याने आपल्या अन्य तीन साथीदारांच्या मदतीने जनावरांच्या चोऱ्या केल्याचे कबूल केले. त्यामुळे माणगावमधील दोन, महाड, तळा आणि गोरेगावमधील प्रत्येकी एक अशा एकूण पाच गुन्ह्यांची उकल करण्यात स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाला यश आले आहे.

या तपासात पोलीस निरीक्षक दयानंद गावडे यांच्यासह उपनिरीक्षक महेश कदम, पोलीस हवालदार राजेश पाटील, यशवंत झेमसे, प्रतीक सावंत, राकेश म्हात्रे, देवराम कोरम, सायबर सेलचे अक्षय पाटील यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# सुडकोळी येथील बांधबंदिस्ती उद्ध्वस्त

## ▪ खाडीलगतच्या भातशेतीचे नुकसान

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील सुडकोळी ग्रामपंचायत हद्दीत नवखार येथील समुद्रखाडीलगतची बांधबंदिस्ती डागडुजी नसल्याने उद्ध्वस्त झाली आहे. त्यामुळे समुद्रखाडीचे पाणी घुसून भातशेतीचे अतोनात नुकसान आहे.

दरवर्षीच अशा प्रकारे येथील शेतकऱ्यांना नुकसानीस सामोरे जावे लागत असल्याने याबाबत ठोस भूमिका घेऊन बंधाऱ्याचे काम लवकरात लवकर मार्गी लावावे, अशी मागणी सुडकोळी ग्रामपंचायत सदस्या रूपाली पाटील यांनी केली आहे.

सुडकोळी ग्रामपंचायत हद्दीत नवखार येथे समुद्र खाडीलगत सुमारे ४५ हेक्टर शेतजमीन आहे. या शेतजमिनीतून मिळणाऱ्या उत्पन्नावर येथील शेतकरी उदरनिर्वाह करतात, परंतु खाडीलगत असलेल्या बंधाऱ्याची डागडुजी न झाल्याने बांधबंदिस्ती उद्ध्वस्त होऊन दरवर्षी खाडीचे खारे पाणी शेतात घुसते. या वर्षी ९० टक्के शेती खाऱ्या पाण्याने भिजून गेली असून, शेतात अद्यापही खारे पाणी आहे. दरवर्षी बांधबंदिस्ती उद्ध्वस्त होऊन खारे पाणी घुसत असल्याने शेतीत पीक घेणे दिवसेंदिवस कठीण झाले आहे. त्यामुळे बांधबंदिस्तीचे काम मार्गी लावून येथील शेतकऱ्यांच्या नुकसानीचे संकट दूर करावे, असे सुडकोळी ग्रामपंचायत सदस्या रूपाली पाटील यांनी स्थानिक आमदारांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

## रायगड जिल्ह्यातील सर्व शाळा आजपासून बंद

**अलिबाग : प्रतिनिधी**

कोरोनाचा धोका वाढल्याने रायगड जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील सर्व शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. आजपासूनच त्याची अमलबजावणी करण्यात आली आहे. इयत्ता पहिली ते नववी आणि अकरावीचे वर्ग ३१ जानेवारीपर्यंत बंद राहणार आहेत. रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत.

कोविडच्या वाढत्या प्रादूर्भावामुळे शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. दहावी आणि बारावीचे वर्ग कोविड नियमांचे पालन करत सुरू राहणार आहेत. जिल्ह्यात कोविडचा प्रादूर्भाव वाढतोय त्याचबरोबर महाड तालुक्यातील विन्हेरे हायस्कूलमधील १५ विद्यार्थी आणि दोन शिक्षकांना कोरोनाची लागण झाली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी हा निर्णय घेतला आहे.

**"जिल्ह्यातील सर्व शाळांमधील पहिली ते नववी, तसेच अकरावीचे वर्ग ३१ जानेवारीपर्यंत बंद राहतील. मात्र बोर्डाची परीक्षा असल्याने दहावी आणि बारावीचे वर्ग कोविडच्या नियमांचे पालन करून सुरू राहतील.**
**-डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी, रायगड**

## कर्जत-माथेरान मिनीबस सुरू करावी
### भाजपची मागणी, एसटी आगारप्रमुखांना निवेदन

**माथेरान : प्रतिनिधी**

कर्जत-माथेरान मिनी बससेवा तातडीने सुरू करावी, अशी मागणी भाजप माथेरान मंडलातर्फे कर्जत एसटी आगारप्रमुखांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

एसटी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे कर्जत-माथेरान मिनी बससेवा बंद आहे. त्यामुळे माथेरानमधील विद्यार्थ्यांना शाळा, महाविद्यालयात, तर नोकरदारांना कामाच्या ठिकाणी येण्या-जाण्यास अडचण निर्माण होत आहे. या पार्श्वभूमीवर माथेरानचे माजी नगरसेवक चंद्रकांत जाधव, प्रदीप घावरे, संदीप कदम, राकेश चौधरी व लक्ष्मण शिंगाडे यांनी सोमवारी कर्जत एसटी आगारप्रमुख यादव यांची भेट घेतली व कर्जत-माथेरान मिनी बससेवा तातडीने सुरू करावी, अशी मागणी केली.



(छाया : भूषण सातपुते)

कर्मचाऱ्यांच्या संपाबाबत येत्या काही दिवसांतच निर्णय होण्याची शक्यता आहे. संप मिटल्यानंतर मिनी बससेवा पूर्ववत सुरू करण्यात येईल, असे आश्वासन आगारप्रमुख यादव यांनी या वेळी दिले.

## सुधागडात कोरोनाचा शिरकाव; तीन रुग्णांची नोंद

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यात मागील अनेक दिवस कोरोनाचा एकही रुग्ण नव्हता, मात्र सोमवारी (दि. ३) दोन आणि बुधवारी (दि. ५) एक असे एकूण तीन कोरोना रुग्ण आढळले असल्याची माहिती तहसीलदार दिलीप रायण्णावार यांनी दिली.

सुधागड तालुक्यात आतापर्यंत कोरोनाचे एकूण १७३१ रुग्ण आढळले असून त्यापैकी १६४८ रुग्ण बरे झाले आहेत. तर ८० रुग्णांचा मृत्यू झाला. दरम्यान, कोरोनाची तिसरी लाट येण्याचा धोका असल्याने सर्व नागरिकांनी शासन नियमांचे पालन करून योग्य खबरदारी व काळजी घ्यावी. घाबरून जाऊ नये, असे आवाहन तहसीलदार दिलीप रायण्णावार यांनी केले आहे.

## मुरूड तालुक्यात ५४ वीजचोरट्यांवर कारवाई
### तब्बल २० लाख रुपयांची दंडवसुली



**मुरूड : प्रतिनिधी**

वीजबिल जास्त येऊ नये म्हणून काही ग्राहक विविध क्लृप्त्या वापरून मीटरमध्ये हेराफेरी करून वीजचोरी करीत असतात. मुरूड तालुक्यातील वीजचोरी करणाऱ्या ५४ ग्राहकांवर महावितरणने धडक कारवाई करून सुमारे २० लाख तीन हजार ४६१ रुपयांचा दंड वसूल केला आहे.

एप्रिल ते डिसेंबर २०२१ या कालावधीत मुरूड महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी तालुक्यातील विविध ठिकाणी धाडी टाकून ४२ लोकांना वीजचोरी करताना रंगेहात पकडले. त्यांच्याकडून १३ लाख ३४ हजार ५३१ रुपयांचा दंड वसूल केला, तर वीजचोरी करणाऱ्या मुरूड शहरातील १२ ग्राहकांकडून सहा लाख ६८ हजार ९३० रुपयांचा दंड वसूल केला.

**"मुरूड तालुक्यात मोठ्या प्रमाणात वीजचोरी पकडून महावितरणने दंड वसूल केला असून, ही कारवाई यापुढेही अशीच सुरू राहणार आहे.**
**-महादेव दातीर, उपमुख्य कार्यकारी अभियंता, महावितरण, मुरूड**

## दामत येथील वीटभट्टीवरील शाळेतील मुलांना मार्गदर्शन

**कर्जत : बातमीदार**

नेरळजवळील बिरदोले गावातील महाविद्यालयीन तरुणीने दामत गावात सुरू केलेल्या वीटभट्टीवरील आदिवासी मुलांच्या शाळेत जाऊन राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त रवी काजले यांनी तेथील मुलांना मार्गदर्शन केले.

नेरळ विद्या मंदिर कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या भाविका भगवान जामघरे हिने कर्जत तालुक्यातील दामत येथे वीटभट्टीवरील कामगारांच्या मुलांसाठी शाळा सुरू केली आहे. रवी काजले गुरुजींनी या शाळेला भेट दिली. व तेथील सर्व ३३ मुलांना वह्या, पुस्तके, पेन्सिल, पेन, कंपास, रंगीत खडू आणि खाऊचे वाटप केले, तर किशोर गायकवाड यांनी मुलांना बसण्यासाठी चटई दिली. या वेळी भगवान जामघरे, जीवक गायकवाड, ॲड. उत्तम गायकवाड हे उपस्थित होते.


**जिल्हा परिषद रायगड**
**ई-निविदा सूचना**

रायगड जिल्हा परिषद, अलिबाग अंतर्गत आरोग्य विभागाकरिता **कंत्राटी सुरक्षा रक्षक पुरविणे**साठी ई-निविदा सूचना http//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत आलेली आहे.

निविदेबाबतीत सर्व माहिती संकेतस्थळावर देण्यात आलेली आहे.

सही/-
जिल्हा आरोग्य अधिकारी
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग


## फणसाड अभयारण्यात पक्षीगणना



(छाया : संजय करडे)

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यातील फणसाड अभयारण्यात ग्रीन वर्क्स ट्रस्ट व वन्यजीव विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ७ ते ९ जानेवारी या कालावधीत पक्षीगणना करण्यात येणार असल्याची माहिती अभयारण्य वनपरिक्षेत्र अधिकारी राजवर्धन भोसले यांनी दिली.

फणसाड अभयारण्याचे क्षेत्र मोठे असून समुद्र सपाटीजवळ असल्याने येथे विविध पक्षी वस्ती करावयास येतात. या अभयारण्यातील पक्षांच्या जाती व विविधता शोधण्यासाठी तीन दिवसीय विशेष पक्षीगणना कार्यक्रम आयोजित केला असल्याची माहिती भोसले यांनी दिली.

गतवर्षी सदर पक्षीगणना ६ फेब्रुवारी रोजी लाईन ट्रान्सेक्ट आणि पॉईंट काऊंट या शास्त्रीय पद्धतीने करण्यात आली होती. त्या वेळी अभयारण्याच्या सुमारे ५४ चौकिमी परिसरात एकूण १९० प्रजातींची नोंद करण्यात आली होती, असे ग्रीन वर्क्स ट्रस्टचे निखील भोपाळे यांनी सांगितले.

माशीमार खाटीक, बेडकमुखी, कोतवाल, कोकीळ, टिकलेचा कस्तूर, विविध प्रजातींचे घुबड, निळ्या चष्म्याच्या मुंगशा, मलबारी कवड्या, धनेश, रंगीत तुतारी, कालव फोड्या, तिरचिमणी, कस्तूर आदी पक्षांच्या दुर्मिळ प्रजातींची नोंद गतवर्षी झाली होती. भीमपंखी फुलपाखरे या अभयारण्यात आढळले असून पहिल्यांदाच त्याची नोंद करण्यात आली आहे. यंदाच्या या पक्षीगणनेत कोणते नवीन पक्षी आढळतात याचे आकर्षण राहणार आहे.


**जाहीर प्रसिद्धीकरण**

वास्तुसिद्धी लॅन्डमार्क रिव्हरसाईड सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., पोयंजे गांव या सहकारी संस्थेचा सन २०२२ ते २०२७ या कालावधीतील पंचवार्षिक निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिद्ध करण्यांत येत आहे. सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. ०७-०१-२०२२ ते १३-०१-२०२२, नामनिर्देशन पत्र छाननी दि. १४-०१-२०२२, नामनिर्देशन माघारी दि. १७-०१-२०२२ ते ३१-०१-२०२२ व आवश्यकतेनुसार मतदान दि. ०६-०२-२०२२ रोजी घेण्यात येईल. तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणुकीबाबत सूचना व अधिक माहिती संस्थेचे कार्यालयात व तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, पनवेल, सुशिला निवास, मिडलक्लास हौसिंग सोसा. पनवेल यांचे कार्यालयात पहावयास मिळेल. तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
(निता पुगांवकर)
निवडणूक निर्णय अधिकारी

**जाहीर प्रसिद्धीकरण**

तळोजा सी.ई.टी.पी. सहकारी संस्था मर्या., तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड या सहकारी संस्थेचा सन २०२२ ते २०२७ या कालावधीतील पंचवार्षिक निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिद्ध करण्यांत येत आहे. सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. ०७-०१-२०२२ ते १३-०१-२०२२, नामनिर्देशन पत्र छाननी दि. १४-०१-२०२२, नामनिर्देशन माघारी दि. १७-०१-२०२२ ते ३१-०१-२०२२ व आवश्यकतेनुसार मतदान दि. ०८-०२-२०२२ रोजी घेण्यात येईल. तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणुकीबाबत सूचना व अधिक माहिती संस्थेचे कार्यालयात व तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, पनवेल, सुशिला निवास, मिडलक्लास हौसिंग सोसा. पनवेल यांचे कार्यालयात पहावयास मिळेल. तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
(सुरेखा पाटील)
निवडणूक निर्णय अधिकारी



**Panvel Municipal Corporation, Panvel**
**TENDER NOTICE**

**Tender Notice No.: MHD/11/2021** **Dated :**

The Commissioner, Panvel Municipal Corporation, Panvel invites tenders through e-TENDERING system for the following work from registered company or Partership firm or sole proprietor.

| Sr. No. | Name of work<br>Description | Location | Cost of blank tender form | EMD |
|---|---|---|---|---|
| 1 | Designing sets of principles or procedure for introspective answering appropriateness vocal responses and interconnected speculative form to monitor and capture daily bases station to station conversation. | PMC | 5,000/- + 18% GST | 50,000/- |

Key Dates -

| Sr. No. | Description | Date | Time |
|---|---|---|---|
| 1 | Publish date | 06/01/2022 | 12:00 |
| 2 | Document Download Start Date | 07/01/2022 | 12:00 |
| 3 | Document Download End Date | 12/01/2022 | 15:00 |
| 4 | Bid Submission Start Date | 06/01/2022 | 12:00 |
| 5 | Bid Submission End Date | 12/01/2022 | 15:00 |
| 6 | Bid Opening Date | 13/01/2022 | 11:00 |

**Note -** The bidders shall have to submit their bids online and upload the relevant documents as per key schedule (key dates)

**Signature of Tenderer**

**Sd/-**
**Medical Officer of Health**



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-14/21-22 / Rfx No.7000020655 | Supply of ATS for newly commission DG set at 400 KV Nagothane s/s under 400kv RS O&M div Nagothane…**2nd call** | **Rs. 97,940/-** | **12.01.2022 up to 23:59hrs** |
| 2 | e-Tender-19/21-22 / Rfx No.7000021566 | Overhauling of 2 no of 400 kV BHEL make SF6 Circuit breaker at 400 kV Nagothane s/s under 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane under EHV (O&M) Circle, Panvel.. **2nd call** | **Rs. 13,20,881/-** | **12.01.2022 up to 23:59hrs** |
| 3 | e-Tender-20/21-22 / Rfx No.7000021802 | E- Tender for construction of revetment & protection wall at various location of 400 kV Nagothane-Padghe (D/C) line & 400 kV Nagothane Dabhol 1 ckt in hilly area under 400 kV Line Maint. S/dn Nagothane under 400 KV RS (O & M) Division Nagothane…. **1st Ext…** | **Rs 22,91,070/-** | **12.01.2022 up to 23:59hrs** |

EMD fee Rs. 5000/- & Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website **https://srmtender.mahatransco.in/** **Contact Person:** MITESH GOYAL Mob No. 9461456635 Email ID : **ee7230@mahatransco.in**

**Note:** All eligible suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**400kV R.S. (O&M) Dn. Nagothane.**

# उलवे नोड प्रीमियर लीगला प्रारंभ

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील शिवाजीनगर येथे उलवे नोड प्रीमियर लीग २०२२ क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी (दि. ५) झाले. ही स्पर्धा शिवाजीनगर येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणावर पाच दिवस रंगणार असून स्पर्धेचे यंदाचे तिसरे वर्ष आहे.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी बोलताना, चांगले काम चालले आहे हे सगळ्यांना समजते, मात्र सिडकोच्या ते लक्षात का नाही येत, असा प्रश्न उपस्थित करीत सर्वांना एकत्र येऊन काम करावे लागेल, असे मत व्यक्त केले, तसेच ग्राऊंडला हिरावून घेण्याची हिंमत सिडको करणार नाही, असेही ते म्हणाले.

या स्पर्धेच्या उद्घाटन समारंभास भाजपचे शिवाजीनगर अध्यक्ष कृष्णाशेठ ठाकूर, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य आबासाहेब देशमुख, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र पाटील, जि. प. सदस्य रवींद्र पाटील, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच हरेश्वर म्हात्रे, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, चंद्रकांत भोईर, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, ज्येष्ठ नेते वसंतशेठ पाटील, कोळी समाजाचे तालुकाध्यक्ष उत्तम कोळी, वहाळ ग्रामपंचायतीचे सदस्य चेतन घरत, आशिष पाटील, अनंताशेठ ठाकूर, भाऊ भोईर, आयोजक सचिन घरत, भाजप नेते सुधीर ठाकूर, समीर पाटील, अमर पाटील, अमर कडू, रवी भोईर, किशोर पाटील, तेजस म्हात्रे, निलेश खारकर, भास्कर घरत, शैलेश पाटील, प्रमोद कडू, धीरज ओवळेकर, मनोज नाईक आदी उपस्थित होते.

# आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते हमरापूर प्रीमियर लीगचे उद्घाटन



**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील हमरापूर येथे प्रीमियर लीग जल्लोष २०२२ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून त्याचे उद्घाटन माजी मंत्री व पेण विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते बुधवारी (दि. ५) झाले. हमरापूर येथील मैदानावर ५ ते ९ जानेवारीपर्यंत हे क्रिकेट सामने होणार आहेत.

उद्घाटन सोहळ्याला भाजपचे दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, चिटणीस बंडू खंडागळे, पेण तालुका अध्यक्ष श्रीकांत पाटील, नगर परिषदेचे सभापती राजा म्हात्रे, सचिन शिगवण, हमरापूरचे सरपंच प्रदीप म्हात्रे, माजी सरपंच वासुदेव म्हात्रे, निळकंठ म्हात्रे आदींसह खेळाडू आणि हमरापूर विभागातील क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

हमरापूर येथील प्रीमियर क्रिकेट लीगमध्ये ३२ संघांनी भाग घेतला असून रविवारी अंतिम सामना खेळविला जाणार आहे.




## रणजीसह स्थानिक क्रिकेट स्पर्धा लांबणीवर

**मुंबई : प्रतिनिधी**

देशातील कोरोना रुग्णसंख्या वेगाने वाढू लागल्यामुळे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) रणजी करंडक, कर्नल सी. के. नायडू करंडक स्पर्धांसह आणखी काही महत्त्वाच्या क्रिकेट स्पर्धा लांबणीवर टाकण्याचा निर्णय घेतला आहे.

## आरोग्य प्रहर

### त्वचा उजळण्यासाठी उपाय



सध्या त्वचेला जास्त काळजीची गरज आहे. तुमचे नैसर्गिक सौंदर्य कायम ठेवण्यासाठी त्वचेची आतून-बाहेरून देखभाल हवी. तुम्ही पार्लरमध्ये जाणे बंद केले तर तुमची त्वचा निस्तेज व्हायला नको. यासाठी आज आम्ही तुमच्यासाठी खास यादी घेऊन आलो. लक्षात ठेवा तुम्हाला दररोज हे पदार्थ खायचे आहेत.

मका (स्वीट कॉर्न), चारोळी, सूर्यफुलाचे बी, खरबुजाच्या बिया, सुकामेवा हे सर्व घटक त्वचा सतेज करतात. त्वचेला आवश्यक असणारे स्निग्ध, जीवनसत्त्व आणि खनिज पुरवतात. यामुळे त्वचेचे कोलेजन वाढवतात. त्वचा डागविरहित, मोकळी आणि तरुण बनवतात.

जर तुम्ही शाकाहारी आहात. लग्नापूर्वी त्वचेला फर्मनेस देऊ इच्छिता तर इथे दिलेल्या सुकामेव्याचे सेवन जरूर करा. जर तुम्ही अंडी खात असाल तर हिवाळ्यात अंड्यांचा आहारात समावेश जरूर करा. तुमच्या डाएटमध्ये दिलेल्या प्रमाणात सुकामेव्याचा समावेश हवा.

दररोज चार अक्रोड खा. दररोज कमीत कमी २० बदाम खा. दररोज दोन अंडी जरूर खा. एक ग्लास दुध प्यायला हवे, तसेच एक वाटी दही खा. दूध आणि दह्याने सुकामेव्याचे पोषण मिळते. शिवाय ॲसिडीटी होत नाही.

फळ खाऊन सौंदर्य वाढवणे ही तर अत्यंत जुनी पद्धत आहे. फळ शरीराला आवश्यक असणाऱ्या पोषण तत्त्वांची कमतरता भरून काढतात. या पोषण तत्त्वांची शरीराला खूप गरज असते. काही फळे तर त्वचेला खूप लवकर उजळून टाकण्यात मदत करतात. त्वचेच्या पेशीला गुळगुळीत करतात. केळ, अननस, अँव्हाकॉडो, सेफ, पपई, डाळिंब, संत्री या फळांची नावं आम्ही जाणीवपूर्वक सांगत आहोत. ज्यामुळे तुमची त्वचा तर छान होईलच, पण तुमच्या खिशावरही अतिरिक्त भार पडणार नाही.

काशीफळाची भाजी खूप चविष्ट होते. विशेष म्हणजे याच्या बिया संपूर्ण वर्षभर उपलब्ध असतात. ही एक अशी भाजी आहे की तुम्ही वर्षभर खाऊ शकता. विशेषतः हिवाळ्यात ही भाजी आवश्यक आहे. मे आणि जूनमध्ये मात्र भाजी नको. काशीफळाचा स्वभाव उष्ण आहे. त्यामुळे या ऋतूत ही भाजी टाळा.

# रिक्षाचालकाच्या मुलींनी जिंकले सुवर्णपदक



**पनवेल : वार्ताहर**

खांदा कॉलनी सेक्टर १४मधील रिक्षाचालक अरविंद मोकल यांच्या संयोगिता व हर्षदा या दोन्ही मुलींनी सुवर्णपदक जिंकले आहे. या यशाबद्दल अरविंद मोकल यांच्यासह त्यांच्या दोन्ही मुलींचे कौतुक होत आहे. मोकल हे रिक्षा व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मुलींना क्रीडा क्षेत्रात आवड असल्याने रिक्षा व्यवसाय करून जमेल तशी मदत करीत ते मुलींना प्रोत्साहन देत असतात.

पुणे बालेवाडी येथे नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय किक-बॉक्सिंग स्पर्धेत संयोगिता अरविंद मोकल हिने पॉईंट फाईट या प्रकारात सुवर्णपदक व किक-लाईट प्रकारात कांस्यपदक जिंकले, तर हर्षदा अरविंद मोकल हिने पॉईंट फाईट व लाईट-कॉन्टॅक प्रकारात सुवर्णपदक जिंकले. या मुली खांदा कॉलनीमध्ये प्रशिक्षक चिंतामणी मोकल यांच्याकडे प्रशिक्षण घेत आहेत.

या स्पर्धेत संपूर्ण देशभरातून १२०० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. यामध्ये रायगड संघाने एकूण २५ सुवर्ण, १२ रौप्य, १३ कांस्य अशा एकूण ५० पदकांची कमाई केली. याबद्दल वाको महाराष्ट्र असोसिएशनचे उपाध्यक्ष व रायगड किकबॉक्सिंगचे अध्यक्ष डॉ. मंदार पनवेलकर, राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजक संतोष म्हात्रे, चिंतामणी मोकल, निलेश भोसले, प्रशांत गांगुर्डे, युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशन इंडियाचे सर्व प्रशिक्षक व पालकांनी व महाराष्ट्र रिक्षा पंचायत शाखा खांदा कॉलनी यांच्याकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : २

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. पुढीलपैकी कोणती एकबँक सार्वजनिक क्षेत्रातील आहे म्हणजे सरकारी आहे?**
***अ.)*** एक्सिस बँक ***ब.)*** आयडीबीआय बँक ***क.)*** बंधन बँक ***ड.)*** इंडिया ओव्हरसीज बँक

**२. डिसेंबरच्या अखेरीस सेन्सेक्समध्ये समाविष्ट झालेल्या आयटी कंपनी कोणती?**
***अ.)*** इन्फोसिस ***ब.)*** टेक महिंदा ***क.)*** विप्रो ***ड.)*** माइंडट्री


**३. शेअर बाजाराच्या निफ्टी इंडेक्समध्ये किती कंपन्यांचा समावेश आहे?**
***अ.)*** १० ***ब.)*** ३० ***क.)*** ५० ***ड.)*** १००

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा.**

॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥



स्व. जनार्दन कृष्णाजी कांडपिळे
यांचे शनिवार दि. 25/12/2021 रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.
तरी त्यांच्या आत्म्यास चिरःशांती लाभो हिच ईश्वर चरणी प्रार्थना
उत्तरकार्य विधी : गुरुवार दि.6/01/2022 रोजी राहत्या घरी पोटी येथे होणार आहे.
•••• शोकाकुल :- समस्त कांडपिळे परिवार ••••

पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी



पनवेल महानगरपालिका हद्दीत
गुरुवार, दि. ६ जानेवारी २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड
सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)
१. यूपीएचसी-२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
२. सिडको सामाज मंदिर, से. ५ ई (ना.पा.आ.के.४, कळंबोली)
३. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
४. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, से. २
५. मनस्मृती रोटरी सेंटर, खारघर
६. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
(पहिल्या सहा आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.)
७. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
८. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
९. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली

कोवॅक्सिन
सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)
१. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
२. काळण समाज हॉल, पनवेल
३. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५, खारघर.

१५ ते १८ वयोगटाचे लसीकरण
- कोकण एज्युकेशन सोसायटी केव्ही हायस्कूल, पनवेल (उपलब्ध लसी ५००)
- महात्मा मराठी इंटरनॅशनल (सीबीएसई) शाळा खांदा कॉलनी (५००)
- केशरचंदजी आनंदरामजी बांठिया शाळा न्यू पनवेल (५००)
- सी. के. ठाकूर विद्यालय मराठी इंग्रजी माध्यमिक, न्यू पनवेल (५००)
- एसईएस मराठी माध्यमिक हायस्कूल कळंबोली (५००)
- बालभारती पब्लिक स्कूल, खारघर (५००)
- डीएव्ही इंटरनॅशनल स्कूल खारघर (४००)
- रेडक्लिफ स्कूल खारघर (४७७)

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com